


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८४ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# फरार विजय मल्ल्या भारतात परतणार?

## मुंबई उच्च न्यायालयाने दिली शेवटची संधी, सुनावणीत केली कानउघडणी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारताचा फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याची थेट मुंबई उच्च न्यायालयाने कानउघडणी केली आहे. याचसोबत भारतात परतण्यासाठी विजय मल्ल्याला शेवटची संधी देण्यात आली आहे. तसेच फ्युजिटीव्ह इकनॉमिक ऑफेंडर कायद्याच्या तरतुदींना आव्हान देणारी यांची प्रलंबित असल्याचा फायदा घेत देशातील तसेच यूनायटेड किंगडममधील न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर राहता येणार नसल्याचेही मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आता विजय मल्ल्याला शेवटची संधी देत त्याने भारतात परतणार की नाही हे स्पष्ट करावे अन्यथा त्यांची याचिका ऐकली जाणार नसल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. विजय मल्ल्याला बजावताना मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले की, तुम्हाला परत यावेच लागेल. तुम्ही परत येऊ शकत नसाल, तर आम्ही तुमची याचिका ऐकू शकत नाही असे स्पष्ट करत तुम्ही न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर पळत आहात. त्यामुळे तुम्हाला या कार्यवाहीचा लाभ घेता येणार नाही. मात्र, तुमच्याशी न्याय राखत आम्ही ही याचिका फेटाळत नाही. तुम्हाला आणखी एक संधी देत याचिकेवर पुढील सुनावणी 18 फेब्रुवारीला निश्चित



केली आहे. विजय मल्ल्याने एफइओ कायद्यातील तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले आहे, तसेच विशेष न्यायालयाने जानेवारी 2019 साली मल्ल्याला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याच्या आदेशाला देखील त्याने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी पार पडली आहे. दरम्यान, 23 डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने भारतात केव्हा परतणार यासंदर्भात भूमिका स्पष्ट करण्यास सांगितले होते. मात्र, गुरुवारी झालेल्या सुनावणीत मल्ल्याने अद्याप कंप्लायन्स प्रतिज्ञापत्र सादर न केल्याची दखल न्यायालयाने घेतली आहे.

### यूनायटेड किंगडममधील प्रत्यार्पणाची कारवाई अंतिम टप्प्यात

प्रतिज्ञापत्रात करण्यात आलेले दावे वस्तुस्थिती नसल्याचे तपास यंत्रणांकडून सांगण्यात आले आहे. यावेळी जर ही याचिका पुढे चालवायची असेल तर भारतात परत यावेच लागेल असे मुंबई उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, यूनायटेड किंगडममधील प्रत्यार्पणाची कारवाई अंतिम टप्प्यात आली असून प्रत्यार्पण होणार हे लक्षात आल्यावर इथे कारवाईला आव्हान देण्यात आल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. तर याचिका दाखल करण्याच्या वेळेस तपास यंत्रणेच्या वकिलांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

# टी-२० विश्वचषकात भारताचा सर्वात मोठा विजय

## ४७व्यांदा २००+ धावा केल्या, हार्दिकने 109 मीटर लांब षटकार मारला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारताने नामिबियाला 93 धावांनी हरवून टी-20 विश्वचषकात आपला सर्वात मोठा विजय नोंदवला. संघाने या फॉरमॅटमध्ये 47व्यांदा 200+ धावांचा टप्पा ओलांडला, तर हार्दिक पंड्याने 109 मीटर लांब षटकार मारला. गुरुवारी प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने 9 गडी गमावून 209 धावा केल्या. ईशान किशनने 20 चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावले. 210 धावांचा पाठलाग करताना नामिबियाचा संघ 18.2 षटकांत 116 धावांवर सर्वबाद झाला.

भारताने टी-20 विश्वचषकात सलग 10वा विजय नोंदवून स्पर्धेच्या इतिहासात नवा विक्रम रचला. विजयाची ही मालिका 2024 च्या हंगामापासून



सुरू झाली होती. दुसऱ्या स्थानावर दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया आहेत, ज्यांच्या नावावर प्रत्येकी आठ सलग विजय नोंदवले आहेत.

भारताने 93 धावांनी विजय मिळवून टी-20 वर्ल्ड कप इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला. यापूर्वी संघाचा सर्वात मोठा विजय 2012 मध्ये कोलंबो येथे इंग्लंडविरुद्ध 90 धावांनी होता.

भारताने टी-20 विश्वचषक इतिहासातील तिसरी सर्वात मोठी धावसंख्या उभारली. संघाने 20 षटकांत 209/9 धावा केल्या. या यादीत भारतानेच 2007 मध्ये इंग्लंडविरुद्ध केलेल्या 218/4 धावांची धावसंख्या अव्वल स्थानी आहे.

भारताने टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 47व्यांदा 200 पेक्षा जास्त धावा केल्या. कोणत्याही संघाने केलेल्या धावसंख्येमध्ये ही सर्वाधिक आहे. या यादीत दक्षिण आफ्रिका (29) आणि न्यूझीलंड (28) मागे आहेत, तर ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिजने प्रत्येकी 25 वेळा हा आकडा पार केला आहे.

विशेष म्हणजे, टी-20 विश्वचषक 2024 नंतर भारताने 14 वेळा 200+ धावसंख्या केली आहे, तर या काळात इतर कोणत्याही संघाने सातपेक्षा जास्त वेळा ही कामगिरी केली नाही.

# रेरा बंद व्हायला हवा, याने पीडितांऐवजी कर्जबुडव्या बिल्डरांना मदत

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

रिअल इस्टेट नियामक प्राधिकरण म्हणजेच रेराच्या औचित्यावर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की ही संस्था आपल्या उद्देशात यशस्वी झालेली नाही. ही पीडितांऐवजी कर्जबुडव्या बिल्डरांना मदत करत आहे. हिमाचल सरकारच्या विरोधात दाखल याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने म्हटले की राज्यांनी याचा विचार करायला हवा की रेराची स्थापना का करण्यात आली होती? ज्या लोकांसाठी रेरा बनवण्यात आला होता, ते पूर्णपणे निराश आहेत. ही संस्था बंद केली तरी त्यांना काही अडचण होणार नाही. रेरा कायद्यात आदेशांच्या



■ सुप्रीम कोर्ट : रिअल इस्टेट रेग्युलेटरी ऑथॉरिटीवर गंभीर ताशेरे

अंमलबजावणीची प्रक्रिया ठरलेली नाही. नागरी वसुलीची प्रक्रिया आहे, जी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवली जाते. बिल्डर लॉबी प्रभावी : बिल्डरांशी संबंधित वाद सोडवण्यासाठी मजबूत आणि व्यवस्थित यंत्रणा नाही.

# आमदार जयंत पाटील महाराष्ट्राच्या राजकारणातील शकुनी मामा

**सांगली : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादीचे आमदार जयंत पाटील हे महाराष्ट्राच्या राजकारणातील शकुनी मामा असून त्यांनी महाविकास आघाडीच्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व गिरीश महाजन यांना तुरुंगात टाकण्याचे षड्यंत्र रचले, असा आरोप करून जयंत पाटील यांच्या पांढऱ्या चेहऱ्यामागे गुन्हेगारीची व्हाइट कॉलर असल्याचा आरोप माजी मंत्री तथा रयत क्रांती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी केला. सांगली जिल्हा नियोजन समितीची बैठक संपल्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी हा आरोप केला. ते म्हणाले, बागणी जिल्हा परिषद गटात माझ्या सूनबाई मोहिनी खोत या विजयी झाल्या आहेत; परंतु या निवडणुकीच्या प्रचाराच्या काळामध्ये जयंत पाटील यांची सर्व वक्तव्ये एकेरी उल्लेख करून



होती. भाषणांमध्ये शिव्या देण्याचा प्रतापही त्यांनी केला, असेही ते म्हणाले. मतदान गोपनीय असते. मात्र त्यांनी दोन दिवस अगोदर यंत्रणांचा वापर करून मोबाइलद्वारे मतदारांकडून कल जाणून घेतले, सर्व डेटा गोळा करून, ज्या मतदारांनी त्यांना नकार कळवला त्यांना धमकावणे, आमिष दाखवणे असे अनेक प्रकार या ठिकाणी घडले, असा आरोपही त्यांनी या वेळी केला.

# अक्कलकोटमध्ये पुन्हा भाजप, पण शिंदेसेनेनेही दाखवून दिले अस्तित्व

## जेऊर, पानंमगरुळ गटात पाटील घराण्याला धक्का, पंचायत समितीवरही भाजपची सत्ता

**अक्कलकोट : (समर्थ गांवकरी)**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निकाल भाजपाला एकतर्फी सत्ता देणारा आहे, तर शिवसेनेचे उमेदवार माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांचे मुलगा व मुलगी दोघेही निवडून आल्याने दोन्ही पक्षाच्या कार्यकर्ते आनंदी झाले आहेत. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेनंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती दोन्हीवर सत्ता मिळवत तालुक्यातील ग्रामीण भागातील आपले वर्चस्व परत एकदा सिद्ध केले. तर काँग्रेस पक्ष सोडून शिवसेनेत प्रवेश केलेले माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या समोर नवीन चिन्ह जनतेमध्ये रुजविण्याचे आवाहन होते.

त्यातच माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या घरातील मुलगा व मुलगी पहिल्यांदा निवडणूक लढवत होते. त्यामुळे त्यांच्यासाठी ही प्रतिष्ठेची निवडणूक होती.




त्यातच ऐन निवडणुकीत पदाधिकारी कार्यकर्ते भाजपा मध्ये गेले होते. शिवराज म्हेत्रे व मुलगी शीतल म्हेत्रे हे दोघेही निवडून आल्याने कार्यकर्ते मध्ये उत्साह संचारला आहे. चपळगाव गटात व गणात भाजपाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी व भाऊ निवडणूक लढवत असल्याने निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती. तशातच वागदरी गटातील आनंद तानवडे शिवसेना शिंदे सेनेत गेल्याने चुरस वाढली. जिल्हा परिषदेच्या सहा गटापैकी तब्बल चार ठिकाणी भाजपा विजयी ठरला तर पंचायत समितीच्या १२ गणापैकी भाजपने ८ जागा जिंकत जनतेने भाजपालाच परत पसंती दिली तर दोन जिल्हा परिषद गट व चार पंचायत समिती गण जिंकत शिवसेना शिंदे गट माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली रंगतदार लढत दिली.

भाजपने चपळगांव, मंगरूळ, जेऊर व नागणसुर चार जिल्हा परिषद गट ताब्यात घेतले तर चपळगांव, कुरनूर, वागदरी, जेऊर, दहिटणे, सुलेरजवळगे, मंगरूळ, नागणसूर या आठ गण जिंकत पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकवला. शिवसेना शिंदे गटाने वागदरी व सलगर जिल्हा परिषद गटावर विजयी झाले तर शिवसेना शिंदे गटाने गटाने शिरवळ, तोलनूर,सलगर व मुगळी या चार पंचायत समिती जिंकत कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य भरले. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शिवसेना शिंदे सोबत एकत्र निवडणुका लढवल्या होत्या. पण त्याचा काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस ला एकही जागा जिंकुन आणता आलेली नाही. इतर पक्षालाही प्रभाव पाडता आले नाही. भाजपा पक्षाने चपळगांव गटात भाजपाच्या शांभवी कल्याणशेट्टी यांनी सर्वाधिक ७१५८ मताधिक्य घेतले तर चपळगांव गणात सागर कल्याणशेट्टी यांनी २६४१ मताधिक्य घेतले.

## थोडक्यात...

### सुनेत्रा पवारांच्या अध्यक्षतेखाली पहिली बैठ

मुंबई (समर्थ गांवकरी) : अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठा बदल झाला. त्यांच्या जागी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि पुण्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारीही स्वीकारली. या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक आज त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अजित पवारांच्या अनुपस्थितीत ही बैठक होत असल्याने वातावरणात भावनिक छटा होती. पुणे विभागीय कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती, तर सुनेत्रा पवार मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाल्या. या बैठकीला पुणे जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याच्या विकास आराखड्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अजित पवार पालकमंत्री असताना ज्या पद्धतीने नियोजनाला गती मिळत होती, त्याच धर्तीवर काम सुरु ठेवण्याचा निर्धार बैठकीत दिसून आला. बैठकीनंतर राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांनी माध्यमांशी संवाद साधत चर्चेचा आढावा दिला.

### ते एकटे पडल्यासारखे दिसत होते

मुंबई (समर्थ गांवकरी) : नरेश अरोरा यांना कॉन्ट्रॅक्ट मिळायलाच हवा, अशी काहींची भूमिका होती. मात्र, अजित दादांची कॉन्ट्रॅक्ट संदर्भात वेगळी भूमिका होती, असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. मी कोणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले नसल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. तटकरे आरोरांच्या कॉन्ट्रॅक्ट साठी चर्चेला गेल्याचा अंदाज असल्याचे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मात्र या सर्व गोष्टींची लवकरात लवकर चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली. दादांना का उशीर झाला? हे मी बोलून दाखवले, दादा गाडीने गेले असते तरी दुर्घटना घडली नसती, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# २४० कोटींचा रस्ते विकास निधी अडवला?

## ठेकेदारांचा संताप शिगेला; मंत्री अशोक उईके यांच्यावर गंभीर आरोपांची मालिका

**(समर्थ गांवकरी)**

कळसुबाई शिखरावरून।
मा.श्री. डॉ. विश्वासराव आरोटे

राज्यातील रस्ते विकास कामांसाठी मंजूर करण्यात आलेला तब्बल २४० कोटी रुपयांचा निधी महिन्यांपासून प्रलंबित असल्याने ठेकेदारांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. मंजूर फाईल असूनही निधी सोडला जात नसल्याचा आरोप थेट आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्यावर होत असून, प्रशासनातील ढिलाई की जाणीवपूर्वक अडवणूक? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ठेकेदारांच्या म्हणण्यानुसार, ऑक्टोबर महिन्यात वित्त विभागाकडून संबंधित फाईलला मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतरही आदिवासी विकास विभागाच्या ५०५४-५११७ टी-६ या लेखाशीर्षकांतर्गत असलेला निधी प्रत्यक्षात वितरित करण्यात आलेला नाही. कामे पूर्ण करून बसलेल्या अनेक कंत्राटदारांचे कोट्यवधी रुपये अडकले असून, आर्थिक संकट तीव्र होत चालले आहे.

"कामे पूर्ण केली आहेत, पैसे मागणे हा आमचा हक्क आहे; उपकार नाहीत," असे ठेकेदारांचे स्पष्ट म्हणणे आहे. मंत्रालयात भेटीसाठी गेलेल्या कंत्राटदारांशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात, कधी संताप व्यक्त केला जातो, तर कधी भेटच दिली जात नाही, असे आरोप समोर येत आहेत. आमदार-खासदारांनाही स्पष्ट प्रतिसाद मिळत नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या पार्श्वभूमीवर मंत्री अशोक उईके यांची कार्यपद्धती आणि निधी वितरणातील विलंबावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्यातील विकास कामे थांबलेली असताना आणि ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडलेले असताना निर्णयप्रक्रिया का थांबली आहे, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

दरम्यान, ठेकेदारांमध्ये दबक्या आवाजात निधी वर्ग करण्यासाठी दलालांच्या माध्यमातून टक्केवारी मागितली जात असल्याच्या चर्चाही सुरू आहेत. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नसून संबंधितांकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

मुख्यमंत्री कार्यालयात फाईल असल्याचे सांगितले जात असले, तरी पुढील प्रक्रिया का होत नाही, यावरही प्रश्नचिन्ह आहे. राज्य




सरकार या प्रकरणात नेमकी कोणती भूमिका घेत आहे, तसेच निधी सोडण्यात होत असलेल्या विलंबाची जबाबदारी कोणाची, याबाबत स्पष्टता नसल्याने ठेकेदार वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

सुशिक्षित बेरोजगार कंत्राटदारांनी कर्ज काढून कामे पूर्ण केली, परंतु देयके अडकल्याने अनेक जण आर्थिक संकटात सापडले आहेत. "निधी मंजूर असूनही रोखून ठेवला जात असेल, तर हा प्रशासनातील गंभीर बिघाड आहे," अशी प्रतिक्रिया बांधकाम क्षेत्रातील प्रतिनिधींनी दिली.

या सर्व आरोपांबाबत आदिवासी विकास मंत्री अशोक उईके किंवा संबंधित विभागाकडून अधिकृत स्पष्टीकरण अद्याप आलेले नाही. मात्र,



प्रकरण गंभीर बनत चालले असून, राज्यातील रस्ते विकास कामांवर त्याचा थेट परिणाम होत असल्याचे चित्र आहे. सरकारकडून लवकरच स्पष्ट भूमिका आणि निर्णय न घेतल्यास ठेकेदारांकडून आंदोलनाचा इशाराही दिला जात आहे.

# बनावट दारू प्रकरणाचे धागेदोरे अकोले-संगमनेरपर्यंत?



**नाशिक/अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील नांदूर-शिंगोटे येथे अलीकडेच उघडकीस आलेल्या बनावट दारू रॅकेटनंतर या प्रकरणाचे धागेदोरे अकोले व संगमनेर तालुक्यांपर्यंत पोहोचत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांकडून करण्यात येत आहे. संबंधित प्रकरणात व्यापक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित लायसनधारक दुकाने तात्पुरती बंद करावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

ग्रामीण व आदिवासी भागात बनावट दारूच्या विक्रीमुळे अनेक मृत्यू झाल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. काही ठिकाणी मृत्यूंची संख्या शंभराच्या घरात असल्याचा आरोप करण्यात आला असून, या सर्व घटनांची स्वतंत्र व सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. मृतांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि जबाबदारांवर गंभीर गुन्हे दाखल करावेत, अशीही भूमिका व्यक्त केली जात आहे.

नांदूर-शिंगोटे येथे कारवाई झाल्यानंतर नगर जिल्ह्यातील संगमनेर, अकोले, राहुरी आदी भागांतील संबंधित गटाच्या दुकानांचीही तपासणी व्हावी, अशी मागणी पुढे आली आहे. काही सामाजिक संघटनांनी या प्रकरणात मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला असून, उत्पादन शुल्क विभागाने सर्व संबंधित गोदामे, पोल्ट्री फार्म, गोडाऊन आणि संशयित साठ्यांची तपासणी करावी, असे निवेदन देण्यात आले आहे.

काही ठिकाणी रात्रीच्या वेळी संशयित वाहनांद्वारे दारूची वाहतूक होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत संबंधित वाहनांची चौकशी करून संपूर्ण साखळी उघड करावी, अशी मागणी होत आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच वरिष्ठ उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित दुकाने बंद ठेवावीत व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

### अधिकृत प्रतिक्रिया प्रतीक्षेत

या सर्व आरोपांबाबत संबंधित दुकानधारक, अधिकारी किंवा प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. तपास यंत्रणा सध्या या प्रकरणाचा छडा लावत असून, संपूर्ण सत्य समोर येणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

# प्रतिक गंगणे यांना 'आदर्श पत्रकार' पुरस्कार



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक भान जपत सातत्याने पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य करणारे पत्रकार प्रतिक गंगणे यांना संध्या परिवाराच्या वतीने 'आदर्श पत्रकार' पुरस्कार प्रदान करण्यात आला. भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि माजी महापौर तथा नगरसेवक प्रशांत जगताप यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी ज्योती नाळे उपस्थित होत्या.

तृप्ती देसाई यांनी सांगितले की, "पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. प्रतिक गंगणे यांनी निर्भीड आणि जबाबदार पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला असून, समाजातील वंचित आणि सामान्य लोकांचे प्रश्न सातत्याने मांडण्याचे काम त्यांनी केले आहे." प्रशांत जगताप यांनीही गंगणे यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "सकारात्मक पत्रकारिता समाजाला दिशा देण्याचे काम करते. गंगणे यांनी विकासकामे, नागरिकांचे प्रश्न आणि सामाजिक विषयांवर प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे." प्रतिक गंगणे यांनी कृतज्ञतापूर्वक हा पुरस्कार स्वीकार करत असल्याचे सांगत 'हा पुरस्कार माझ्यासाठी प्रेरणादायी असून, यापुढेही सातत्याने समाजातील प्रश्न मांडत जनतेचा आवाज होण्याचा प्रयत्न राहील."

# वाशी APMC व महापे वाहतूक विभागात 'दैनिक समर्थ गांवकरी' २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन!



**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

वाशी APMC वाहतूक विभाग तसेच महापे वाहतूक विभाग येथे दैनिक समर्थ गांवकरी २०२६ दिनदर्शिका व दैनिकाचा विशेष अंक यांचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी वाहतूक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिनदर्शिका व अंक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. वाशी APMC वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी भांडवलकर साहेब यांना दैनिक समर्थ गांवकरी २०२६ ची दिनदर्शिका आणि दैनिकाचा अंक प्रदान करण्यात आला. तसेच वाशी APMC वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक घंटे साहेब यांनाही दिनदर्शिका व अंक देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी वाहतूक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनिक समर्थ गावकरीच्या सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर कार्याचे कौतुक केले. २०२६ ची दिनदर्शिका उपयुक्त माहिती, महत्त्वाचे दिनविशेष व समाजाभिमुख संदेशांनी परिपूर्ण असून ती सर्वसामान्य नागरिकांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी दैनिक समर्थ गांवकरी च्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर पोलीस स्टेशन येथे श्रीराम सोन्याबापू शिंदे पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या आदेशाने डायल ड्युटीवर कर्तव्यवहार हजर असताना ११२ नंबर वर कॉल सांगितले की, या ठिकाणी भांडण सुरू आहे . पोलीस अंमलदार विशाल चौधरी यांना घेऊन पचलिंग वस्ती या ठिकाणी गेलो असता. आकाश संजय कोळेकर वय २० वर्षे हा दारू पिऊन पंचलिंग वस्ती रस्त्यावर मोठमोठ्याने आरडाओरडा करून लोकांना मारहाण करण्याची व शिवीगाळ धमकी देत होता .लोकांवर अंगावर धावून , लहान मुले व महिला त्याला घाबरून पळून जात होते. त्याप्रमाणे आम्ही कोळेकर ताब्यात घेतल्या असतात त्याच्या तोंडाचा घाण उग्र वास येत होता . त्या पोलीस ठाण्यात आणताना त्याने त्याच्याकडील ब्लेडने डाव्या हातावर वार करून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

# आदिवासी विकास विभागातील २४० कोटींचा निधी रखडला?

■ ठेकेदारांमध्ये संतापाची लाट!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत रस्ते विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या सुमारे २४० कोटी रुपयांच्या निधीचा प्रश्न सध्या चर्चेत आला आहे. संबंधित फाइल अनेक दिवसांपासून प्रलंबित असून निधी अद्याप वितरित करण्यात आलेला नसल्याची माहिती ठेकेदारांकडून पुढे येत आहे. या पार्श्वभूमीवर ठेकेदार वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. माहितीनुसार, ऑक्टोबर २०२५ मध्ये वित्त विभागाकडून संबंधित फाइलला मंजुरी मिळाल्यानंतर ती पुढील प्रक्रियेसाठी पाठविण्यात आली. मात्र त्यानंतर निधी वितरणाची प्रक्रिया रखडल्याचा आरोप काही ठेकेदारांनी केला आहे. ही फाइल मुख्यमंत्री कार्यालयात असल्याचे सांगितले जात असून अद्याप अंतिम आदेश मिळालेला नसल्याची माहिती समोर येत आहे. आदिवासी विकास विभागाच्या ५०५४-५११७ टी-६ या लेखाशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे बिल प्रलंबित असल्याचा दावा ठेकेदारांकडून केला जात आहे. मार्च २०२५ पासून अनेक कामे पूर्ण करूनही देयके न मिळाल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत, असे काही कंत्राटदारांचे म्हणणे आहे. काही ठेकेदारांनी असा आरोप केला आहे की, मंत्रालयात भेटीसाठी गेल्यावर त्यांना समाधानकारक प्रतिसाद मिळत नाही. तसेच आमदार व खासदारांनाही स्पष्ट माहिती दिली जात नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, आदिवासी विकास मंत्र्यांचे खाजगी सचिव ललितकुमार वराडे यांच्याबाबतही काही ठेकेदारांमध्ये कुजबुज सुरू आहे. निधी वर्ग करण्यासाठी कथितरित्या टक्केवारीची मागणी होत असल्याची चर्चा ठेकेदारांमध्ये आहे. मात्र या संदर्भात कोणतीही अधिकृत तक्रार अथवा ठोस पुरावा अद्याप समोर आलेला नाही.

### मुख्यमंत्र्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष?

काही ठेकेदारांचा दावा आहे की, मुख्यमंत्र्यांकडून निर्देश मिळूनही निधी वितरणाचा निर्णय पुढे ढकलला जात आहे. यामुळे विभागीय कामकाजावर परिणाम होत असल्याचे सांगितले जाते.

या सर्व आरोपांबाबत आदिवासी विकास मंत्री अशोक उईके किंवा संबंधित विभागाकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. निधी वितरण प्रक्रियेत प्रशासकीय कारणांमुळे विलंब होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जर लवकरात लवकर निधी वितरित झाला नाही, तर राज्यभरातील ठेकेदार संघटनांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे. "आम्ही फुकटचे पैसे मागत नाही; पूर्ण केलेल्या कामांचे देयक मागत आहोत," अशी भूमिका काही ठेकेदारांनी व्यक्त केली. या प्रकरणात प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडणे आणि प्रलंबित निधीबाबत पारदर्शक माहिती देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. पुढील आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन या प्रश्नाचा पाठपुरावा केला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# पंढरपूरात अकोलेतील वारकऱ्यांचा भक्तिमय दर्शन सोहळा!

**पंढरपूर : (समर्थ गांवकरी)**

"सुंदर ते ध्यान उभे विटेवरी,
कर कटेवरी ठेवूनिया..."
या अभंगाच्या ओव्या जपत विठुरायाच्या दर्शनाची ओढ मनात बाळगून नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील चितळे गावातील वारकरी संप्रदायातील भाविकांनी पंढरपूर नगरीत जाऊन श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले. भक्तिभावाने विठुरायाच्या आणि रुक्मिणी मातोश्रींच्या चरणी नतमस्तक होत शेतकरी बळीराजाला सुखाचे दिवस यावेत, कर्जमुक्ती व्हावी, अशी सामूहिक प्रार्थना यावेळी करण्यात आली.

पंढरपूर ही वारकरी संप्रदायाची पावन भूमी. देशभरातून कोट्यवधी भाविक येथे दर्शनासाठी येतात. या पावन नगरीत दर्शनाचा योग लाभणे, हीच आयुष्यातील मोठी कमाई असल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली. विठुरायाच्या दर्शनानंतर प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान आणि भक्तिभाव झळकत होता.



यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख नागेश अदापुरे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती, शाल व पुष्पगुच्छ देऊन भाविकांचा सन्मान करण्यात आला. पंढरपूर नगरीत विठुरायाच्या साक्षीने होत असलेला हा सन्मान सोहळा भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

या प्रसंगी प्रगतशील शेतकरी यशवंत आरोटे, दादाभाऊ आरोटे, नामवंत उद्योजक रमेश मोहटे, दत्तात्रय आरोटे व निवृत्ती आरोटे यांचाही सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभरातून पंढरपूर येथे येणाऱ्या मान्यवरांचा सत्कार केला जातो. राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या संकल्पनेतून "पत्रकार हा समाजाचा समाजसेवक" या भावनेतून हे कार्य सातत्याने राबवले जात असल्याचे नागेश अदापुरे यांनी सांगितले.

पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी येणाऱ्या भाविकांना सन्मान देणे हीच खरी समाजसेवा असून, पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी राज्यातील विविध तीर्थक्षेत्रांवर अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भक्ती, सन्मान आणि समाजसेवेचा संगम घडवणारा हा दर्शन सोहळा पंढरपूर नगरीत उत्साहात व समाधानाच्या वातावरणात संपन्न झाला.

# अकोल्यातील महिलांचे उल्लेखनीय यश

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ नुकत्याच संपन्न झाल्या. तालुक्यातील महिलांनी उज्वल यश संपादन करत जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी तालुक्याला मिळवली. पारितोषिक वितरण जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी साहेब यांच्या हस्ते, तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके व सर्व विभागांचे खातेप्रमुख यांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धांमध्ये पंचायत समिती अकोले येथील विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून क्रीडा व सांस्कृतिक प्रकारांत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट व नेत्रदीपक कामगिरी केली.

# सांगवी धरणातून शेतीसाठी रोटेशन पाणी सोडण्यास पालकमंत्र्यांचा हिरवा कंदील!



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सांगवी धरणातून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी रोटेशन पाणी सोडावे, या मागणीसाठी आज जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या श्रीमती सुनिताताई अशोकराव भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री तथा राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत शेतकऱ्यांनी सध्याच्या पिकांची स्थिती, पाण्याची तातडीची गरज आणि संभाव्य नुकसान याबाबत सविस्तर माहिती मंत्री महोदयांना दिली.

सदर मागणीची दखल घेत नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगवी धरणातून शेतीसाठी रोटेशन पाणी सोडण्यास तत्त्वतः मान्यता देत हिरवा कंदील दाखवला, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी बबन सदगिर, गणपत देशमुख, अक्षय देशमुख, तुकाराम सदगिर, दीपक जगताप, राहुल देशमुख, भास्कर दराडे, आयुब शेख, बच्छाव एखंडे, बाबुराव घोडसरे, आप्पासाहेब देशमुख, सुनील दातीर, जयश्री देशमुख, अतुल पवार आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय झाल्याबद्दल उपस्थितांनी सुनिताताई भांगरे व पालकमंत्री विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले.

# मोफत महाआरोग्य शिबिर संपन्न

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

न्यायिक मानवाधिकार परिषद शाखा राजूर व वेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. सचिन हिवराळे व डॉ. प्रियंका हिवराळे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे कौठवाडी येथे हनुमान मंदीर येथे शिबिर संपन्न झाले. कौठवाडी गावचे सरपंच लता धादवड, उपसरपंच लता भोईर, ग्रामस्थ दत्तू भोईर, राजेंद्र धादवड, आशा सेविका आशा भांगरे, गोविंद भोईर, विष्णू भांगरे, इंदुराज धादवड, संजय धादवड या सर्वांनी डॉ. सचिन हिवराळे, डॉ. प्रियंका हिवराळे, डॉ.सानिका पवार, न्यायिक मानवाधिकार परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रा. योगेश बाराथे,एन. एम. पी. चे महाराष्ट्र राज्याचे संपर्क प्रमुख ढगे एम. एन,अहिल्यानगर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख वसंत आरोटे,एन. एम. पी. महाराष्ट्र राज्याचे सचिव शामराव पवार यांचा सत्कार केला. डॉ. सचिन हिवराळे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले व मोफत तपासण्या, गोळ्या, औषधे दिले.तालुक्याचे आमदार डॉ.किरणजी लहामटे (वैद्यकीय सहाय्यक कक्ष) यांचे मदतीसाठी नेहमी हात पुढे असतात. सर्व टिमला व पथकाला आधार देत आहे. म्हणूनच आदिवासी अती दुर्बल भागात जाऊन मोफत महाआरोग्य शिबिर घेत आहे.

डॉक्टरांची नेहमी असणारी मदत व पाठिंबा यामुळे संपूर्ण टिम मध्ये गावागावांमध्ये जाऊन मोफत तपासण्या गोळ्या, औषधे ऑपरेशन मोफत करण्यासाठी एक प्रकारे ऊर्जा आनंद त्यांच्याकडून मिळत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध असलेले मौजे कौठवाडी या गावी मोफत महाआरोग्य शिबिराचा सर्व गावकरी, ग्रामस्थ, महिला, पुरुष, मुले ,मुली यांनी लाभ घेतला. दऱ्याखोऱ्यात जाऊन एन. एम. पी.व डॉक्टरांची टिम मानव सेवा हीच ईश्वर सेवा समजून आरोग्याचे काम करीत आहे.

# उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान व RSETI यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हास्तरीय कौशल्य मेळावा उत्साहात संपन्न

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत RSETI योजनेच्या माध्यमातून आज, दि. १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी कल्याण येथे कौशल्य मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले. हा मेळावा महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) ठाणे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ठाणे यांच्या संयुक्त पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.



ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) योजना ही केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणारी महत्त्वपूर्ण योजना असून ग्रामीण भागातील १८ ते ५० वयोगटातील युवक-युवतींसाठी १० ते ४५ दिवसांचे मोफत निवासी व अनिवासी प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाते. या अंतर्गत सुमारे ६४ प्रकारची मान्यताप्राप्त स्वयंरोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. यात शेतीविषयक उद्योजकता, प्रक्रिया उद्योग, उत्पादन आधारित उद्योग तसेच सामान्य उद्योजकता विकास यांसारख्या विविध प्रशिक्षणांचा समावेश आहे.

या कौशल्य मेळाव्याद्वारे RSETI योजनेची माहिती, विविध शासकीय योजना, स्वयंरोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, बँक कर्ज योजना व उद्योजकता विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित युवक-युवतींनी विविध स्टॉल्सना भेट देत नोंदणी करून योजनांची माहिती घेतली.

यावेळी प्रकल्प संचालक, जिल्हा परिषद ठाणे छायादेवी शिसोदे यांनी युवकांना कौशल्य प्रशिक्षणाचे महत्त्व पटवून देत स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी RSETI, MSRLM व कौशल्य विकास योजनांची माहिती सादर केली. तसेच अग्रणी बँक जिल्हा व्यवस्थापक अभिषेक पवार यांनी विविध बँक कर्ज योजनांबाबत मार्गदर्शन करत अधिकाधिक युवकांनी प्रशिक्षण घेऊन उद्योजक बनावे, असे आवाहन केले. राज्य संचालक जयानंद भारती यांनी विविध कौशल्य उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

या मेळाव्यास मोठ्या संख्येने युवक-युवती, महिला बचतगट सदस्य, प्रशिक्षणार्थी व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक ठाणे आशिष लोहकरे यांनी केले तर प्रशिक्षक ठाणे सेहल खंडागळे यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आशिष लोहकरे, जिल्हा व्यवस्थापक (आर्थिक समावेशन) प्रतिक्षा आगिवले, उमेद अभियान तालुका व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तसेच RSETI संस्थेचे कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कौशल्य मेळावा युवक-युवतींना रोजगाराभिमुख दिशा देणारा ठरला असून स्वयंरोजगार व उद्योजकता विकासासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात यश आले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ओला-उबेर चालकांकडून मनमानी; ग्राहकांना त्रास

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अ‍ॅप-आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या ओला आणि उबेर चालकांकडून प्रवाशांकडून अ‍ॅपवर दाखवलेल्या रकमेऐवजी मीटरप्रमाणे किंवा अतिरिक्त पैसे मागितले जात असल्याच्या तक्रारींमध्ये अलीकडे मोठी वाढ झाली आहे. या प्रकारामुळे प्रवाशांचा मानसिक तसेच आर्थिक छळ होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

साधारणपणे ओला आणि उबेरवर प्रवास बुक करताना अ‍ॅपवरच भाड्याची निश्चित रक्कम दाखवली जाते. ही रक्कम अंतर, वेळ, ट्रॅफिक आणि मागणी-पुरवठ्याच्या आधारे ठरवली जाते. नियमानुसार प्रवाशाने अ‍ॅपवर दर्शवलेली रक्कमच अदा करणे अपेक्षित असते. मात्र प्रत्यक्षात काही चालक प्रवाशांना फोन




करून 'मीटरने येणार', 'अ‍ॅपचे भाडे कमी आहे', 'ऑफलाइन पैसे द्या' असे सांगून अधिक पैसे मागत असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

काही प्रकरणांमध्ये भाडे न दिल्यास बुकिंग रद्द करणे, प्रवासात अडथळा आणणे किंवा मध्येच उतरवण्याचा दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे विशेषतः महिलां, ज्येष्ठ नागरिक आणि रात्री प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे.

वाहतूक तज्ज्ञांच्या मते, अ‍ॅप-आधारित टॅक्सी सेवांमध्ये अ‍ॅपवर दाखवलेले भाडेच अंतिम मानले जाते. मीटरप्रमाणे वेगळे पैसे मागणे किंवा ऑफलाइन व्यवहार करण्यास भाग पाडणे हे नियमबाह्य ठरू शकते. ग्राहकांची फसवणूक किंवा जबरदस्ती केल्यास संबंधित चालक तसेच कंपनीवर कारवाई होऊ शकते.

दरम्यान, काही चालकांनी इंधन दरवाढ, अ‍ॅप कंपन्यांचे कमिशन, वाहन देखभाल खर्च आणि ट्रॅफिकमुळे वाढणारा वेळ यामुळे अ‍ॅपवरील भाडे अपुरे पडत असल्याचे सांगत आपली बाजू मांडली आहे. मात्र या कारणांमुळे प्रवाशांकडून नियमबाह्य पद्धतीने अतिरिक्त पैसे मागणे योग्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

नागरिक आणि प्रवासी संघटनांनी प्रशासनाकडे या प्रकाराची दखल घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अ‍ॅपवरील भाडेच अंतिम असल्याची स्पष्ट अंमलबजावणी, तक्रार नोंदणीची सुलभ व्यवस्था आणि नियम मोडणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

ओला-उबेरसारख्या सेवांचा उद्देश पारदर्शक आणि सोयीस्कर प्रवास देणे हा असताना, वाढत्या तक्रारींमुळे प्रवाशांचा विश्वास डळमळीत होत आहे. या प्रकारावर लवकरात लवकर नियंत्रण आणण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

ओला-उबेरसारख्या अ‍ॅप-आधारित सेवांचा मुख्य उद्देश प्रवाशांना पारदर्शक आणि निश्चित भाड्यात सुरक्षित प्रवास देणे हा आहे. अ‍ॅपवर स्पष्ट रक्कम दाखवली जात असताना चालकांकडून मीटरप्रमाणे किंवा अतिरिक्त पैसे मागणे ही गंभीर बाब आहे. यामुळे प्रवाशांचा मानसिक तसेच आर्थिक छळ होत असून, ग्राहकांचा या सेवांवरील विश्वास कमी होत आहे.

> प्रशासन आणि संबंधित कंपन्यांनी याची तातडीने दखल घेऊन अ‍ॅपवरील भाडेच अंतिम असल्याची कडक अंमलबजावणी करावी, तसेच नियम मोडणाऱ्या चालकांवर कारवाई करावी. प्रवाशांना सुरक्षित, पारदर्शक आणि त्रासमुक्त सेवा मिळणे हीच काळाची गरज आहे.
>
> **- प्रतिक गंगणे**
> **प्रवासी, ओला/उबेर**

# स्थानिक वहानांनाही आता द्यावा लागणार टोल

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**




ओतूर पासून जवळच असलेल्या आहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील डुंबरवाडी ता:- जुन्नर येथील टोलनाक्यावर स्थानिक वाहनांना सवलत देण्यात येत होती मात्र दि:-११ फेब्रुवारी पासून सर्व प्रकारच्या व्यवसायीक वाहनांना टोल भरावा लागेल अशी माहिती डुंबरवाडी टोलनाक्याचे व्यवस्थापक योगेश नानकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

कार लाईनच्या वाहनांना सुमारे ३५०/- रु पर महिना मोजावा लागणार असून इतर सर्व प्रकारच्या वहानांना हा दर वेगवेगळा आकारण्यात आलेला आहे.याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, स्थानिक व्यवसायीक वाहन चालक लोकल सांगून टोल देत नसल्याने टोल प्रशासनाचे नुकसान होत आहे असे कारण देत टोल प्रशासनाला नॅशनल हायवेचे पत्रक प्राप्त झाल्यामुळे हा नव्याने नियम करावा लागत असल्याचे व्यवस्थापकांनी दैनिक समर्थ गावकरी शी बोलताना स्पष्ट केले आहे. तरी सर्व वाहन चालक- मालकांनी याची नोंद घेण्याचे आवाहन टोल प्रशासनाने केले आहे. जुन्नर तालुक्यातील स्थानिक वाहन चालकांना आपले आधारकार्ड दाखविल्यानंतर डुंबरवाडी टोलनाक्यावर सूट दिली जात होती तीच पद्धत योग्य आहे मासिक पास घेणं सर्वांना शक्य होणार नाही अन्यथा तो मोफत दिला पाहिजे या शिवाय वाहन स्थानिक आहे की नाही ते नाही हे टोल बुथवर तपासता येते त्यामुळे नुकसान होऊ शकत नाही असे स्थानिक वाहन। चालकांनी सांगितले.

# आत्मविश्वास हाच खरा पेपर आहे : विजय पवार

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

आजचा संघर्षच उदयाच्या यशाची गोष्ट सांगतो. त्यासाठी मन शांत ठेवा,विश्वास ठेवा,आत्मविश्वास निर्माण करा. कारण आत्मविश्वास हाच खरा पेपर आहे.असे प्रतिपादन संचालक विजय पवार यांनी केले. राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे नवभारत छात्र निवास व श्रीमती. सावित्रीबाई मदन कन्यानिवास वसतिगृहामध्ये इ.10 वी मधील विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ मोठ्या आनंदामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक विजय पवार हे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे दिपक माने उपस्थित होते. विजय पवार यांनी पुढे मार्गदर्शन करताना परिक्षा म्हणजे सुवर्णसंधी आहे. त्यात यश संपादन करण्यासाठी कॉपी विरहीत पेपर लिहिण्याने मनाला जास्त आनंद होतो असल्याचे मत



व्यक्त केले. दिपक माने यांनी सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. एस. एस. सी. म्हणजे आपल्या जीवनाचा पाया आहे. येथून पुढे आपल्या जीवनाला वेगवेगळ्या दिशा मिळतात. त्यामुळे अधिक चांगला मनःपूर्वक अभ्यास करून चांगले पेपर लिहिण्यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. वसतिगृहातील या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी दिपक माने यांनी पेपर लिहिण्यासाठी एकूण 80 पॅड वाटप केले.सर्व विद्यार्थ्यांसाठी फरसाण व मिठाई वाटप करण्यात आले. नवभारत छात्र निवास वसतिगृहातील विद्यार्थी मुंढे अविनाश, वैराळ शुभम, शेळके शुभम, गायकवाड आर्यन, आवारी प्रसाद यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीमती. सावित्रीबाई मदन कन्यानिवास मधिल विद्यार्थिनी समीक्षा सदगीर, योगिता शिंदे, कार्तिकी धोंगडे यांनी मनोगत व्यक्त केले. अधिक्षक मच्छिंद्र ढगे यांनी सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी व एस.एस.सी. बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा परिषद ठाणेची कामगिरी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित "सेवाकर्मी + पुरस्कार" कार्यक्रमांतर्गत राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यांकनात जिल्हा परिषद ठाणे यांनी उल्लेखनीय कामगिरी नोंदवत १०० पैकी ८० गुणांकन मिळवून "सेवाकर्मी पुरस्कार" प्राप्त केला आहे. राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषदांमध्ये स्थान मिळविणे ही जिल्हा परिषद ठाणेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.या मूल्यांकनासाठी शासनाच्या विविध निकषांनुसार प्रशासनिक कार्यपद्धती, सेवाविषयक नोंदींचे व्यवस्थापन, कर्मचारी सेवा विषयक पारदर्शकता, वेळेवर नोंदी अद्ययावत ठेवणे, शासकीय सेवा नियमांचे पालन तसेच कार्यालयीन कामकाजातील शिस्त आणि गुणवत्तेचा सखोल आढावा घेण्यात आला.

# खासदार नीलेश लंके गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीला

## तीन महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन नागरिकांशी संबंधित विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी खासदार लंके यांनी तीन स्वतंत्र निवेदने सादर करून तातडीच्या कारवाईची मागणी केली. पहिल्या निवेदनात महाराष्ट्र राज्यात गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याच्या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यात आले. जादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतल्यानंतर पैसे परत न देणे, धमकावणे व आर्थिक गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप संबंधित संस्थेवर आहेत. या प्रकरणाची ईडी, सीबीआय यांसारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय मिळवून द्यावा, तसेच भविष्यात अशा फसव्या योजनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.



दुसऱ्या निवेदनात पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी संदर्भातील प्रश्न उपस्थित करण्यात आला. पंतप्रधान कार्यालय 'सेवा तीर्थ' या नव्या इमारतीत स्थलांतरित झाल्यानंतर लोकप्रतिनिधींना अधिकृत कामासाठी प्रवेश नाकारला जात असल्याने गंभीर आजारी नागरिकांच्या मदत प्रकरणांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले. लोकप्रतिनिधींना त्यांच्या संवैधानिक कर्तव्यांचे पालन करण्यासाठी पीएमएनआरएफ विभागात प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी विनंती करण्यात आली.

तिसऱ्या निवेदनात पुणे येथील गुन्हे शाखा युनिट-१३ (गुप्तचर विभाग) च्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. न्यायालयाच्या आदेशानंतरही युनिटचे कामकाज सुरू न झाल्याने आणि १७० कर्मचाऱ्यांचे १८ महिन्यांचे वेतन थकीत राहिल्याने त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार युनिट-१३ चे कामकाज तातडीने सुरू करून सर्व थकीत वेतन अदा करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी खासदार लंके यांनी केली.

सामान्य नागरिकांच्या हिताशी निगडित प्रश्नांवर केंद्र सरकारने तातडीने, समन्वयाने आणि प्रभावी कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत खासदार नीलेश लंके यांनी सकारात्मक प्रतिसादाची आशा व्यक्त केली.

# सांस्कृतिक कार्यक्रमाचा थरार; विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ

**इगतपुरी : (समर्थ गांवकरी)**

इगतपुरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारशिंगवे येथे मंगळवार, दि. १० फेब्रु २०२६ रोजी 'सांस्कृतिक महोत्सव - २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे नामदेव साबळे (मा.प.स.सदस्य) काशिनाथ कोरडे (अध्यक्ष रा. का) सरपंच वसंत बोराडे, उपसरपंच पोपट लहामगे, पोलीस.पा. सुभाष कोरडे आणि स्थानिक शिक्षणप्रेमींच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. पहिलीपासून ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यामध्ये महाराष्ट्राची लोकधारा, आदिवासी नृत्य आणि देशभक्तीपर सामूहिक नृत्ये आकर्षण ठरली. सांस्कृतिक



जनजागृती विषयावर आधारित पथनाट्याने सामाजिक संदेश दिला.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. कैलास भवारी यांनी आपल्या भाषणात, "सांस्कृतिक कार्यक्रम हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत," असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी, उल्लेखनीय शैक्षणिक आणि सांस्कृतिक यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रम चे सुत्रसंचालन श्री. रमेश भांगरे, श्री. साहेबराव भोये यांनी केले. आंबेकर सर, पी. घारे सर, खांडवी सर, लोहकरे सर, जाधव मॅडम, एस.घारे सर, मदगे सर सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे हा महोत्सव यशस्वी झाला. या कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. व बालकांचे कौतुक केले. मुख्याध्यापक यांनी आभार मानले. व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# डॉ. उमेशराज पनेरु यांना पुरस्कार

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर येथील क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ.उमेशराज पदमराज पनेरु यांना सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांच्या ७७ व्या विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त "उत्कृष्ट क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक" (ग्रामीण विभाग) हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.सदर पुरस्कार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी,उपकुलगुरू डॉ.पराग काळकर व कुलसचिव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव संदीप कदम व खजिनदार मोहनराव देशमुख प्रमुख उपस्थित होते. पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, गौरवचिन्ह व मेडल असे होते.

# आठवा वर्धापन सोहळा उत्साहात संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीराम गुरुकुल शिक्षण संस्थेचा गिरवली येथे आठवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहा मध्ये संपन्न झाला.हा सोहळा हरिभक्त परायण माधव महाराज घुले यांच्या हरी किर्तनाणे संपन्न झाला. याप्रसंगी महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार मृदंगाचार्य, गायनाचार्य मान्यवर उपस्थित होते. या शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण विकास महाराज हगवणे यांच्या माध्यमातून ही संस्था अतिशय सुंदर प्रकारे चालत आहे जवळजवळ या संस्थेमध्ये शंभरहून अधिक विद्यार्थी शालेय शिक्षण घेत असतानी वारकरी संप्रदायाचे शिक्षण देखील सुंदर प्रकारे घेत आहे. आई-वडिलांपेक्षा चांगली विद्यार्थ्यांची काळजी विकास महाराज घेत आहे आणि म्हणूनच छोट्याच्या रोपाचा मोठा गट वृक्ष होत आहे. याप्रसंगी मान्यवर उपस्थिती ह.भ.प



नामदेव महाराज वाळके,दत्तात्रय महाराज रूकारी,भिकु महाराज आनंदराव,तान्हाजी महाराज सावंत,घोडेगाव पंचायत समितीचे सदस्य कैलास बुवा काळे.मंचर नगरसेवक बाजीराव मोरडे. संतोष सैद सरपंच मंगल हगवणे उपसरपंच अनिल सैद अन्नदान श्रीराम गुरुकुल सर्व पालक व जिल्हा परिषद सदस्य सुवर्णा दरेकर यांच्या वतीने व मंडप सैन्यानं ह.भ.प.लक्ष्मण महाराज लांडगे. या कार्यक्रमाचे विशेष कार्यक्रमाला जुन्नर आंबेगाव खेड तालुक्यातील साठ कीर्तनकार प्रवचनकार गायक वादक महाराज मंडळी उपस्थित होती.

व कीर्तनासाठी पंचक्रोशीतील ३००० लोकांनी उपस्थिती दाखवली. कार्यक्रमा चे सुत्रसंचलन ह.भ.प श्रीकांत महाराज दुराफे यांनी केले.

# 'अर्थसंकल्प २०२६ परिपेक्ष' याविषयावरील एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

> ■ पोस्टर प्रदर्शन व अर्थसंकल्प नाविण्यपूर्ण रांगोळी स्पर्धेचे आयोजन

श्री शिव छत्रपती महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग व आयक्यूएसी अंतर्गत 'अर्थसंकल्प २०२६ परिपेक्ष' याविषयीची कार्यशाळा सोमवार दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड.संजय शिवाजीराव काळे व अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाल्याची माहिती महाविद्या- लयाचे प्राचार्य डॉ.एम. बी.वाघमारे यांनी दिली.या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे, मार्गदर्शन आणि कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिद्ध लेखिका आणि सहा. प्राध्यापिका व रिता इंडिया फाउंडेशन पुणे संचालिका प्रा. डॉ.रिता मदनलाल शेटीया यांनी केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी.वाघमारे होते. या कार्यशाळेच्या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन व अर्थसंकल्प नाविन्यपूर्ण रांगोळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून राजगुरुनगर येथील रत्नाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील पवार,भोसरी येथील प्रीतम प्रकाश महाविद्यालयाचे डॉ.सचिन पवार,चाकण येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाचे डॉ.उमेश भोकसे उपस्थित होते. विकसित भारतासाठी गतिमान व सर्वसमावेशक व रोजगार निर्मितीसाठी अर्थसंकल्पाच्या तरतुदीची चर्चा करताना डॉ.रिता शेटीया यांनी पीपीटी प्रेझेंटेशन च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची मार्मिक उत्तरे दिली अध्यक्षीय मनोगनातून प्राचार्य डॉ.एम.बी. वाघमारे यांनी भारत हा शेती प्रधान देश असून त्याच्यावरील अवलंबित्व अजूनही मोठ्या प्रमाणावर आहे.

# चाईल्ड फंड इंडिया, जुन्नर (पुणे) अंतर्गत वॉश क्लबची स्थापना

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

चाइल्डफंड इंडिया, जुन्नर प्रकल्पाच्या अंतर्गत दहा शाळां मध्ये वॉश क्लब ची स्थापना करण्यात आल्याची माहिती संस्थेचे वरीष्ठ प्रकल्प अधिकारी अभिजित मदने यांनी दिली.या क्लबच्या माध्यमातून शाळांमध्ये स्वच्छता राखणे,स्वच्छतेच्या योग्य पद्धती,कचरा व्यवस्थापन तसेच वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होऊन शाळा परिसर स्वच्छ व आरोग्यदायी राहावा या उद्देशाने ही समिती गठीत करण्यात आली आहे.या क्लब साठी निवडणूक पद्धतीने सदस्यांची निवड करण्यात आली.यासाठी मतदान केंद्राची स्थापना करून विद्यार्थ्यांकडून प्रचार व मतदान प्रक्रिया




राबविण्यात आली,ज्यामुळे मुलांना लोकशाही प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. क्लब अंतर्गत विद्यार्थ्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून त्यामध्ये वॉश मॉनिटर,हायजिन मॉनिटर, कचरा व्यवस्थापन मॉनिटर अशी पदे देऊन विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्यात आला आहे.या उपक्रमात मान्यवरांनी मार्गदर्शन केले.या मध्ये संस्थेचे ब्रँड अँबिसेडेर कोपरे-मांडवे येथे रविंद्र भोर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.संपूर्ण नियोजन मगेश आतकर यांनी केले.रवी शिंदे यांनी पांगरीमाथा येथे कोळवाडी येथे कविता घोलप यांनी,श्रीमती शेवंता वाघ यांनी तर आळु येथे दिपाली जगताप,विश्वास गलफाडे, या सर्व संस्थेचे समन्वयक यांनी वॉश क्लब स्थापनेत मोलाचे योगदान दिले. सदर कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य व योगदान दिले. यावेळी मार्गदर्शन करताना रविंद्र भोर यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्व पटवून देणे , वैयक्तिक स्वच्छता,सामूहिक स्वच्छता कशी राखावी,हात धुण्याची योग्य पद्धत कशी आहे,प्लास्टिकच्या बाटल्या डबे वापरू नये,वापरल्यास आरोग्या वर होणारे घातक परिणाम अशा अनेक गोष्टींचे मार्गदर्शन यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले विद्यार्थ्यांना खाऊ ही मिळाला त्यामुळे मुलांचा आनंद द्विगुणित झाला.

अशा प्रकारे प्रत्यक्ष जाऊन शाळा असो की प्रौढ व्यक्तींसाठी असो आरोग्य विषयक,रोजगार विषयक,गरीब मुलांच्या शिक्षणा साठी असो,संकटकाळी असो, सामाजिक पुढाकार घेऊन पारदर्शक आणि तळागाळापर्यंत काम करणारी चाईल्ड फंड इंडिया ही एकमेव सामाजिक संस्था असल्याची खात्री यावेळी देण्यात आली या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबद्दलची सवय विकसित होत असून शाळांमध्ये स्वच्छ व सुरक्षित वातावरण निर्माण होण्यास मदत होण्यास,पाण्याचे महत्त्व व बचत करण्याची सवय विकसित होण्यास मदत होईल.

# म. रा. ग्राम रोजगार सेवक संघटनेचा विविध मागण्यासाठी मोर्चा धडकला

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

देशव्यापी संपामध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक संघटना आयटक सलग्न यांनी पण भाग घेऊन आपल्या विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी नांदेड येथे रोजगार सेवक संघटनेच्या वतीने दिनांक १२ फेब्रुवारी रोजी भव्य मोर्चा धडकला. कामगार नेते प्रदीप नागापूरकर जिल्हा सचिव शिवाजी फुलवले जिल्हा सहसचिव देवराव नारे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मागणी ३ ऑक्टोंबर २०२४ चा शासन निर्णयाची अंमलबजावणी




करून ग्राम रोजगार सेवकांना फिक्स मानधन देण्यात यावे.

दोन मे २०११ चा शासन निर्णय रद्द करून ग्राम रोजगार सेवकांना पूर्ण वेळ कर्मचारी शासन निर्णय काढण्यात यावे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना २००५ हे कायदे अंतर्गत असल्यामुळे ती योजना बंद न करता चालू करण्यात यावे.

उमरी तालुक्यातील मौजे चिंचाळा आणि बेलदरा येथील ग्राम रोजगार सेवकांना बेकायदेशीर रित्या करण्यात आलेले आहे कुठले शासन निर्णयाचे अंमलबजावणी करण्यात आले नाही त्यामुळे त्या दोन्ही रोजगार सेवकांना कामावर घेऊन त्यांचं मानधन देण्यात यावे व संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. नायगाव तालुक्यातील ग्राम रोजगार सेवकांचे मानधन मार्च २०२५ चे मानधन त्वरित देण्यात यावे. वरील मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवक संघटना आयटक संलग्न यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना मोर्चा काढून निवेदन देण्यात आले

जिल्हाध्यक्ष सय्यद मलंग जिल्हा सचिव प्रकाश बैलकवाड

नायगाव तालुका अध्यक्ष उत्तम हनमंते तालुका उपाध्यक्ष काशिनाथ पाटील शिंपाळे. नायगाव तालुका सचिव आईलवार हनुमंत यादवराव हनवटे. रावसाहेब बेलकर.राजाराम रोडे, परडे पाटील.माधव झुंजारे. गंगाधर बसवंते.शिवाजी पाटील ढगे.गौतम कांबळे सोमठाणकर यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.



महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस जिवन पाटील घोगरे यांनी घेतली भेट

## थोडक्यात बातम्या...



### जि.प.प्रा.शाळेत जाणाऱ्या शिक्षकेला निरोप तर येणाऱ्या शिक्षिकेचे स्वागत

**अर्धापूर (स. गांवकरी) :** तालुक्यातील कलदगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत श्रीमती ममता किशोर सोनटक्के बद्दली झाल्याबद्दल निरोप देण्यात आला. तर श्रीमती गीता राजाराम देवपूजे ह्या शिक्षीका शाळेवर रुजू झाल्यामुळे गावकरी मंडळीच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास शालेय समितीचे अध्यक्ष शंकर गव्हाणे, केंद्रप्रमुख विकास चव्हाण,पसचे सचिन खिल्लारे यांच्या उपस्थिती गजानन गव्हाणे पाटील यांच्या पुढाकाराने सत्कार करण्यात आला. निरोप व स्वागत कार्यक्रमास केंद्रप्रमुख चव्हाण,केंद्रीय मुख्याध्यापक एस.सावते, शाळेचे मुख्याध्यापक व्ही.एस.लोणे, श्रीमती जी.आर.देवपूजे, अंगणवाडी कार्यकर्ती व्हि.के.शिंदे, चेअरमन दाजीबा पाटील गव्हाणे,सरपंच शाम तिम्मेवारी,उपसरपंच सौ.मंदाकिनी गव्हाणे,सदस्य रवी एगडे,रावसाहेब गव्हाणे, संभाजी गव्हाणे,माणिक गव्हाणे, व्यंकट गव्हाणे,देवजी पाटील गव्हाणे,नवनाथ गव्हाणे,बजरंग शिंदे,माधव गव्हाणे,गोविंद कपाटे,संतोष गव्हाणे,कैलास गव्हाणे, आनंद तिडके, आदी सह गावकरी मंडळी व विद्यार्थी यांच्या वतीने येणाऱ्या शिक्षिकेचे स्वागत तर जाणाऱ्या शिक्षकेला निरोप देण्यात आला शिक्षीका ममत्ता सोनटक्के, शिक्षीका गिता देवपूजे यांच्या सत्कार करण्यात आला.



### क्रिशा शेवाळे या विद्यार्थिनीचे आर्यभट्ट गणित चॅलेंज - 2025 परीक्षेत सुयश

**अकोले (स. गांवकरी) :** सीबीएससी बोर्ड आयोजित आर्यभट्ट गणित चॅलेंज 2025 या परीक्षेत वसुंधरा अकॅडमीची क्रिशा ऋषिराज शेवाळे या विद्यार्थिनीने पुणे विभागात पहिल्या १०० विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सीबीएससी बोर्ड कडून क्रिशाला सर्टिफिकेट ऑफ मेरिट देऊन गौरवण्यात आले. क्रिशाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सेक्रेटरी विक्रम नवले, सह सेक्रेटरी प्राचार्या अल्फोन्सा डी. , उपप्राचार्य राधिका नवले व सर्व शिक्षकांनी क्रिशा आणि तिच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

### वसुंधरा अकॅडेमीमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा संपन्न



**अकोले (स. गांवकरी) :** वसुंधरा अकॅडेमीमध्ये इयत्ता ६ ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शारीरिक सक्षमता आणि स्वतःच्या सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यशाळेसाठी अनुभवी स्वसंरक्षण प्रशिक्षक राजेश अंकम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यशाळेच्या सुरुवातीला राजेश अंकम यांनी स्वसंरक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांशी संवाद साधला व विद्यार्थ्यांना तायक्वांदो व कराटेची चित्तथरारक प्रात्यक्षिके करून दाखविली. आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता शांतपणे विचार करून योग्य निर्णय घेणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना विविध आत्मसंरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. हल्ल्यापासून बचाव करण्याचे सोपे व प्रभावी उपाय, शरीराचा समतोल राखणे, हात-पायांचा योग्य वापर, तसेच स्वतःची सुरक्षितता प्रथम कशी जपावी याचे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या तंत्रांचा सराव केला. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, शारीरिक शिक्षणाबरोबरच मानसिक सक्षमतेसाठी आत्मसंरक्षण प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरते, असे मत व्यक्त केले. यउपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. वसुंधरा अकॅडेमीने या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव प्रा. अल्फोन्सा डी. उपप्राचार्य राधिका नवले व सर्व पालक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्या - ऍड. गायकवाड

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**



शालेय जीवनातून बाहेर पडताना विद्यार्थ्यांनी मोठी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी कठोर मेहनत घ्यावी असे प्रतिपादन ऍड. पांडुरंग गायकवाड यांनी १० विच्या विद्यार्थ्यांना शुभेछया देतात केले जय मल्हार विद्यालय पिंपळगाव रोठा ता पारनेर या विद्यालयात मार्च 2026 ला प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उत्तम सुंबरे सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंग्लिश स्कूल सुपा येथील प्राचार्य मंगेश जाधव ,प्रा. गंभीरे सर, प्रा. वायभासे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ऍड. पांडुरंग गायकवाड मा.अध्यक्ष कोरठण खंडोबा देवस्थान, दादाभाऊ नरवडे, नरवडे सर. जि.प.शाळा, नानाभाऊ भांबरे, बबन चिमाजी पुंडे, शांताराम खोसे, बंडू काका, किसन मुंडे, शंकर गायकवाड, लहू सुंबरे, बबन शेठ गायकवाड, शिवाजी उमाप,श्री जरांगे सर, श्री केदारी सर आदींसह विद्यालयाचे सर्व कर्मचारी, पालक, ग्रामस्थ, हितचिंतक, माजी विद्यार्थ्यांची उपस्तीथी होती. गायकवाड पुढे म्हणाले विद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा आहे.गेली पाच वर्षे विद्यालयाचा 100%टक्के निकाल लागत आहे.त्या अनुषंगाने या बॅच कडून देखील 100% निकालाची अपेक्षा व्यक्त केली आणि विद्यार्थ्यांना परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या जाधव सर यांनी आपल्या भाषांनातून उघड्या डोळ्यांनी समाजाकडे पहा. यश सहज कधीच मिळत नाही कठोर मेहनत करा. योग्य समन्वय ठेवा. Neet, Jee. Cet ची तयारी करण्यासाठी विद्यालयात लेक्चर आयोजित करावे व त्यांना मार्गदर्शन करावे.यानंतर . प्राध्यापक वायबसे सर यांनी जनता विद्यालय मंदिर कान्हूर पठार येथे उपलब्ध असलेल्या सर्व कोर्सेसची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सुंबरे सर व दहावी वर्गाचे वर्गशिक्षक श्री उंडे सर यांच्या शुभ हस्ते एस.एस.सी. बॅचने दिलेल्या सरस्वती मातेच्या प्रतिमेचा स्वीकार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनी कु.प्रिया बाळू माकरे,कु. प्रांजल भाऊसाहेब जगदाळे यांनी केले व उपस्थितांचे आभार कु.कोमल जीवराज पुंडे हिने मानले.

## किशन पचलिंग लातूर विभागात अव्वल व महाराष्ट्रात चौथा

**नायगाव: (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील शिक्षक किशन पचलिंग यांची महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्राथमिक शिक्षक, माध्यमिक व ज्युनिअर शिक्षक व अधिकारी व कर्मचारी गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत किशन धोंडीबा पचलिंग यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातून चौथा क्रमांक पटकावला आहे. व लातूर विभागातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे.तालुका ,विभाग व राज्य असे त्रिस्तरीय चाळणी परीक्षा झाल्या. विद्यार्थी प्रिय शिक्षक अशी ओळख असणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा



कौडगाव तालुका उमरी जिल्हा नांदेड शाळेतील प्राथमिक पदवीधर किशन पचलिंग सर यांनी या तिन्ही परीक्षेत प्रभावी कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य, जिल्हा शिक्षण अधिकारी , गट शिक्षण अधिकारी, केंद्रप्रमुख ,विविध शिक्षक संघटना,शिक्षक वर्ग पत्रकार तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## आर्थिक मदत व परिक्षार्थी यांना परिक्षा पॅडचे वाटप



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक बांधिलकी जोपासत इंदिरा गांधी हायस्कूल हडको येथील सन १९८६ चा माजी विद्यार्थी यांच्या कडून २०२६ चा दहावी वर्गातील परिक्षार्थी विद्यार्थ्यांना परिक्षा प्याडचे वाटप व दोन होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली या केलेल्या उल्लेखनीय कार्याची शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वागत केले.

इंदिरा गांधी हायस्कूल सन १९८६ बॅचचा वतीने माजी विद्यार्थीनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा कार्यालयीत अव्वर सचिव सरोजताई पुराणिक यांच्या संकल्पनेतून कै.स्वाती बासरकर यांच्या स्मृती प्रित्यार्थ दहावी परीक्षा देणाऱ्या २०२६ च्या बॅचच्या जवळपास २५० विद्यार्थ्यांना परिक्षा प्याडचे , पेनचे वाटप करून या वर्गातील दोन होतकरू असलेले विद्यार्थी मनिष बालाजी देवरे व सानिका केशव कदम या दोन जणांना आर्थिक मदत पत्रकार रमेश ठाकूर व सहशिक्षिका बेताळे यांच्या हस्ते करण्यात आली , यावेळी मुख्याध्यापक जि.एम. शिंदे,पर्यवेक्षक डॉ ए.डी.गरड,रमेश सज्जन, अमर बायस .कार्यालयीन प्रमुख एस.बी.घाटोड शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते, यावेळी या उपक्रमाचे अनेकांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले.

## संघभावनेतून पत्रकारांच्या कौटुंबिक आठवणींची घट्ट वीणेचा स्नेहमेळा

### पत्रकारांच्या कौटुंबिक जीवनात आनंदाचा रंग मैत्रीचा उत्सव

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

धावपळीचे आयुष्य, सततचा तणाव आणि बातम्यांच्या अखंड दडपणात जगणाऱ्या पत्रकारांसाठी आयोजित करण्यात आलेला 'लयभारी' पत्रकार कौटुंबिक स्नेह संवाद मेळा म्हणजे मनाला दिलासा देणारा, तणावग्रस्तलेल्या भावनांना नवसंजीवनी देणारा आणि नव्या ऊर्जेचा श्वास ठरला. शब्दांच्या चौकटीबाहेर जाऊन मैत्री, कुटुंबीय प्रेम आणि आपलेपणाची वीण अधिक घट्ट करणारा हा उपक्रम पत्रकारांच्या जीवनात अविस्मरणीय आनंदानुभूती देणारा ठरला.

बातम्यांच्या व्यापातून थोडा वेळ बाजूला होत, संघभावनेत एकत्र आलेल्या पत्रकारांनी या कार्यक्रमातून कौटुंबिक जिव्हाळा, मैत्रीची ऊब आणि आपुलकीचा अलौकिक अनुभव घेतला. या व्यापात आपलीच नाती हरवू न देता,

एक दिवस आपल्यासाठी आपल्या कुटुंबीयांसाठी हे धागा पकडत कौटुंबिक मैत्रीची नाळ अधिक घट्ट ठेवत आकर्षक पैठणीने या स्नेहमेळाव्याच्या सौंदर्यात




वेगळीच झळाळी आणली. निमित्त होते पत्रकारांच्या कौटुंबिक स्नेह मेळाव्याचे हा स्नेहमेळा संगमनेर तालुक्यातील झोळे येथील एका फार्म हाऊस वर घेण्यात आला बालपणातील आठवणी जागवणारा आईच्या मायेने केलेले गंध, बाळावर पावडर फासण्याचे कोवळे क्षण, सहचारिणी सहकार्यांसोबत अनुभवलेला सामुदायिक विवाहाचा भावनिक सोहळा आणि मंगलाष्टकांच्या नादात पुन्हा एकदा नात्यांची घट्ट होत गेलेली गुंफण या साऱ्याने उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. संगीताच्या ठेक्यावर केवळ पत्रकारच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबीयांचे आणि मुलांचेही पावले थिरकली. कार्यक्रमाची सुरुवात संघटनेचे प्रभारी अध्यक्ष संजय अहिरे यांच्या प्रभावी प्रास्ताविकाने झाली. गोरक्षनाथ मदने आणि संघटनेचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार श्याम तिवारी यांनी आपल्या मनोगतातून पत्रकारांच्या व्यथा, संघर्ष आणि संघटनेचे महत्त्व अधोरेखित केले. वाकचौरे यांनी शिक्षण व्यवस्थेतील भरकटलेपणावर परखड भाष्य करत, टक्केवारीपेक्षा ज्ञानाचे अर्थार्जन, मूल्याधिष्ठित जीवनशैली आणि समाजासाठी उपयुक्त ठरणारे व्यक्तिमत्त्व घडवण्यावर भर देण्याचा मोलाचा संदेश दिला. अनेकदा अपयशी ठरलेली माणसेही समाजासाठी आदर्श ठरू शकतात, असा जीवनघडवणीचा विचार त्यांनी मांडला. हा दिवस केवळ पत्रकारांसाठी नव्हे, तर त्यांच्या कुटुंबांसाठीही तणावमुक्तीचा, आनंदाचा आणि नव्या ऊर्जेचा उत्सव ठरला. फार्महाऊसवर लाभलेल्या क्षणिक विसाव्यात शेतात मारलेले फेरफटके, झोपाळ्यावरचे हसरे क्षण, प्राण्यांच्या पुतळ्यांसोबत बालगोपाळांचा मनमुराद आनंद, श्वानाच्या भूंकण्यांत मिसळलेली बालहर्षाची किलबिल, गरम कांदा भजी आणि फक्कड चहाच्या घोटांनी आनंद अक्षरशः पारावर राहिला नाही. निसर्गाशी जोडलेली ही नाळ तणावग्रस्त मनांना नवसंजीवनी देणारी ठरली.

गप्पांच्या ओघात आयुष्यात काय कमावले, कुटुंबाची दिशा काय असावी आणि नात्यांना अधिक जवळ कसे आणावे, याबाबत आत्मचिंतनाचा प्रवास घडत गेला. 'लय भारी संगमनेरी' या गोकूळ राहणे दांपत्याने कार्यक्रमाची धुरा समर्थपणे सांभाळली. प्रत्यक्षात सूत्र प्रत्येकाच्या हातात होते आणि सामुदायिक विचारातूनच हा उपक्रम एका वेगळ्याच उंचीवर पोहोचला.

## महानगरपालिकेच्या स्थायी, महिला बालकल्याण समिती सभापतिपदावर अनेकांचा डोळा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर येथील महानगरपालिकेत महापौर ज्योती गाडे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्यानिवडीनंतर आता स्थायी समिती सभापती, महिला बाल कल्याण समिती सभापती, सभागृह नेता आणि विरोधी पक्ष नेते पदाच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विरोधी पक्ष नेते पदावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दावा सांगितला असला तरी या पदावरही भाजपचाच नगरसेवक बसणार असल्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. स्थायी समिती सभापतीपदी आणि इतर महत्वाच्या पदांवर कोणाची वर्णी लागते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

महापालिकेत राष्ट्रवादी काँगेसच्या महापौर ज्योती गाडे व भाजपचे उमहापौर ॲड. धंनजय गाडे यांची यांनी पदभार घेतल्यानंतर स्थायी समिती सभापती, महिला बाल कल्याण समिती सभापती, उपसभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेते पदाच्या निवडीसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत.

महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे २७, भाजपचे २५, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे १०, काँग्रेसचे २, एमआयएमचे २, बसपा १ व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे १ असे संख्याबळ आहे. महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपने सत्ता स्थापन केली असून राष्ट्रवादी काँग्रेस मनपात सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. २५ जागा मिळवत भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. तर शिंदे यांची शिवसेना तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे.

महापालिकेत राष्ट्रवादीचा महापौर आहे आणि भाजपचा उपमहापौर विराजमान झाला आहे. दरम्यान शिवसेनेने विरोधी पक्ष नेतेपदावर दावा सांगत नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांचे नाव पुढे केले आहे. याबाबतचे शिफारस पत्र गटनेते दत्तात्रय कावरे यांनी महापौरांना दिले आहे. भाजप दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असल्याने भाजपकडून विरोधी पक्ष नेता पदावर ठोस दावा सांगितला असल्याची माहिती आहे. स्थायी समिती व महिला बालकल्याण समिती सदस्यांच्या निवडी झाल्यानंतर स्थायी समिती सभापती व महिला बालकल्याण समितीचे सभापती व उपसभापती निवडीसाठी निवडणुकीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात येईल. निवडणुकीसाठी सभेची तारीख जाहीर झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन निवडणूक पार पडणार आहे.

महापौर व उपमहापौर निवडणुकीनंतर स्वीकृत सदस्य, तसेच स्थायी समिती व महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांच्या निवडी विशेष सभेत केल्या जाणार आहेत. दोन्ही समित्यांमध्ये प्रत्येकी १६ सदस्य नियुक्त केले जाणार आहेत. मनपाच्या विशेष सभेत संबंधित पक्षांच्या गटनेत्यांकडून सदस्यांच्या नावांची शिफारस करण्यात येणार आहे.

युतीच्या पद वाटपात सुरुवातीला स्थायी समितीचे सभापतीपद भाजपला तर महिला बालकल्याण समितीचे सभापती पद राष्ट्रवादीला दिले जाण्याची शक्यता आहे. दोन्ही समित्यांवरही राष्ट्रवादी - भाजपचेच वर्चस्व राहणार आहे. स्थायी समितीवर जाण्यासाठी अनेकांनी फिल्डींग लावली आहे. स्थायी व महिला बाल कल्याण समिती सभापतीपदी कोणाची वर्णी लागतेय हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

महापालिका निवडणुकीमध्ये अनेकांनी गुडघ्याला बाशिंब बांधून तयारी केली होती. परंतु, जागा वाटपात निवडणूक लढविण्याची संधी न मिळाल्याने अनेकांना नेत्यांनी थांबण्याचा सल्ला दिला होता. तसेच काहींना स्विकृतचा शब्द देण्यात आला होता असे इच्छुकांकडून सांगितले जात आहे.

महापालिकेत स्विकृतमधून सहा जणांची नगरसेवकपदी निवड होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन, भाजप दोन तर शिंदे शिवसेनेचा एक नगरसेवक निवडला जाणार आहे. स्विकृत नगरसेवक होण्यासाठी इच्छुकांची संख्या वाढल्याने नेत्यांची डोकेदुखी वाढली आहे. तर जालीम उपाय म्हणून नेतेमंडळींकडून सव्वा, सव्वा वर्षासाठी स्विकृत नगरसेवकांची निवड केली जाणार असल्याची माहिती आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

### पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना पुण्यतिथीनिमित्त

# पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्यावतीने अभिवादन

## शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी पंडित दीनदयाळ पतसंस्था स्वतंत्र कक्ष सुरू करणार- वसंत लोढा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवतावाद हा विचार मांडला.मै अपने लिये नही,अपनों के लिये हु!हा

पंडित दीनदयाळ यांच्या विचारांचा वारसा घेऊन गल्या पस्तीस वर्षापासून समाजातील शेवटच्या स्तरावरील माणसांची पत निर्माण करण्याचे कार्य पंडित दीनदयाळ पतसंस्था अविरतपणे करत आहे. अंतोदय योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचली तरच मोठ्या प्रमाणात बदल घडू शकतो.या पंडित दीनदयाळ यांना अपेक्षित असलेल्या योजना गेल्या दहा वर्षापासून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्र व राज्य सरकारने वेगवेगळ्या योजना सुरू केल्या आहेत.या सर्व योजनांची सविस्तर माहिती व योजनांचे फॉर्म लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या वतीने स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात येईल.असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे. पंडित दीनदयाळ पतसंस्थेमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास प्रसिद्ध कव्वाली गायक पवन नाईक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा,मानद सचिव विकास पाथरकर,व्हाईस चेअरमन सुधीर पगारिया,संचालक बाबासाहेब साठे,अनंत होशिंग, निलेश लोढा,आदित्य चांदेकर

दीनदयाळ परिवाराचे कार्याध्यक्ष सुरज आग्रवाल,सचिव बाळासाहेब भुजबळ,भारतीय जनता पार्टीचे कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे विवेक वाडेकर,नरेंद्र श्रोत्री,राजकुमार जोशी,किशोर गांधी,गोकुळ काळे, ए. एम. कुलकर्णी, साहेबराव विधाते, प्रशांत मुथा,सचिन पारखी,मयूर बोचुघोळ,निलेश चिपाडे,नाथा देवतरसे आदी उपस्थित होते.गोकुळ काळे यांनी सूत्रसंचालन केले आभार बाबासाहेब साठे यांनी मानले.

# महिला व दोन अल्पवयीन मुलं बेपत्ता

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



## कॅम्प पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद

अहिल्यानगर जिल्ह्यातील बु-हाणनगर परिसरातून एक महिला व तिची दोन अल्पवयीन मुले बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार येथे मिसिंग रजिस्टर नंबर ११/२०२६ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सौ. छाया विष्णु चुंभळकर (वय ३०) ह्या दि. ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता दोन मुलांसह निघून गेल्या आहेत. त्यांच्यासोबत श्रावणी विष्णु चुंभळकर (वय १०) व गणेश विष्णु चुंभळकर (वय ३) ही दोन मुले आहेत. सदर प्रकार बु-हाणनगर, ता. जि. अहिल्यानगर येथे घडला. मिसिंग महिलेचे वर्णन असे – चेहरा गोल, रंग गोरा, नाक सरळ, अंगात साडी,मुलगी श्रावणी – चेहरा गोल, रंग गोरा, नाक सरळ, केस बॉबकट. मुलगा गणेश – चेहरा गोल, नाक सरळ, केस बारीक. याबाबत संतोष बापु पुकाळे (वय ३६, रा. बाणेश्वर कॉलनी, बु-हाणनगर) यांनी खबर दिली असून, दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.२३ वाजता अपहरण/मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. पोहेकॉ ८५९ मोहन माणिक भेटे, कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार यांच्या मार्फत तपास सुरू असून सदर महिला व मुलांचा शोध घेण्याचे काम पोलीस प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू आहे. सदर व्यक्तींबाबत कोणास माहिती मिळाल्यास जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अहिल्यानगरमधील कोठला परीसरात मध्यरात्री झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे एकजण गंभीर जखमी



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

या घटनेमागे मुकुंदनगर परिसरातील जैद सय्यद याचे नाव समोर येत असल्याची माहिती आहे. वैयक्तिक वादातून हा गोळीबार झाला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र नेमका वाद कशामुळे झाला याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर येऊ शकलेली नाहीये. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी करून पंचनामा करण्यात आला असून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. या गोळीबाराच्या घटनेमुळे कोठला आणि मुकुंदनगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात असल्याचं सांगितलं आहे. दरम्यान जखमी अबरार शेख याची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती असून पुढील तपास सुरू आहे.

नगर शहरातील कोठला परिसरात बुधवारी (ता. ११) रात्री उशिरा झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज चेंबरसमोर रात्री सुमारे सव्वा अकराच्या सुमारास ही घटना घडली आहे. या गोळीबारात अबरार मुख्तार शेख हा २५ ते ३० वर्षे वय असणारा तरुण गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ अहिल्यानगरच्या शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. त्यानंतर त्याच्यावर सध्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, अबरार शेख हा राज चेंबरसमोर उभा असताना अचानक त्याच्यावर गोळी झाडण्यात आली. गोळी त्याच्या शरीराच्या खालच्या भागावर लागल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला.

गोळीबाराच्या घटनेनंतर परिसरात एकचं गोंधळ उडाला. स्थानी नागरिकांनी तातडीने या घटनेबाबत पोलिसांना माहिती दिली आणि जखमी अबरारला ताटाकल जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला पुढील उपचारांसाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# मुखेड : भूकंपाचे सौम्य धक्के

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

मुखेड तालुक्यातील हिब्बट, कोळगाव, धामणगाव, मोटरगा, हसनाळ . धनज व जामखेड या गावांमधून आज दिनांक ११ फेब्रुवारी रोजी दुपारी ३. २५ वाजता भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली होती त्यानुसार राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता दिनांक ११ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.२० वाजता या धक्क्याची नोंद झाली असून या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ३. ० एवढी नोंदविण्यात आली असून याचा केंद्रबिंदु नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील खपराळ गावाजवळ असल्याचे कळते. सदर धक्का हा अतिसौम्य प्रकारचा आहे तसेच या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत तहसीलदार मुखेड यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे.

# खुल्या टेनिस क्रिकेट स्पर्धेचे अंतिम सामन्यांचे शिवराजदादा धोंडगे यांनी केले उद्घाटन

- दत्तात्रय महाराज यात्रेनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धेचे पहिले बक्षीस शिवराज धोंडगे यांनी दिले व द्वितीय गणेश घोरबांड
- अंतिम प्राप्ती चे मानकरी न्यु सहारा क्रिकेट संघ कुरुळा तर द्वितीय क्रिकेट संघ सोनखेडने जिंकले

**कंधार-तालुका : (समर्थ गांवकरी)**



दगड सांगवी येथे दत्तात्रय महाराज यात्रेनिमित्त भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पांडुरंग फाजगे मित्र मंडळ व मंगेश फाजगे, विशाल मोरतळे , राहुल फाजगे,यांनी केले होते. क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामन्याचे उद्घाटन कंधार लोहा तालुक्याचे माजी आमदार शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांचे चिरंजीव सामाजिक कार्यकर्ते जनसामान्य माणसाच्या अडचणीवर मात करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे युवा नेतृत्व शिवराज दादा धोंडगे यांच्या हस्ते झाले. व पहिले बक्षीस शिवराज धोंडगे यांनी ३१०००दिले. तर द्वितीय बक्षीस ११००० गणेश पाटील घोरबांड यांनी दिले. याप्रसंगी दगडसांगवी नगरीचे सरपंच प्रदीप पाटील फाजगे दगडसांगवी चे सेवानिवृत्त पोलीस पाटील शिवाजी पाटील फाजगे, पोलीस पाटील मुरलीधर फाजगे, चेअरमन मनोहर पाटील फाजगे, ग्रामपंचायत सदस्य बळीराम पाटील कल्हाळे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग पाटील फाजगे, माजी ग्रामपंचायत सदस्य उद्धवरावफाजगे, संग्राम पाटील फाजगे, अण्णाराव पाटील फाजगे, पिराजी मोरतळे, बालाजी पाटील फाजगे, संदीप सोनवणे, रमेश सोनवणे, मंगेश फाजगे, रघुनाथ फाजगे, विशाल मोरतळे, बाबु गोरे उपस्थित होते. अंतिम सामना न्यू सहारा क्रिकेट टीम कुरुळा व क्रिकेट संघ सोनखेड यांच्यामध्ये झाला या अतितटीच्या सामान्यांमध्ये न्यु सहारा क्रिकेट संघ कुरुळा ने अंतिम ट्राफी वर आपलं नाव कोरल पहिलं बक्षीस ३१०००मिळवल सोनखेड क्रिकेट

संघाने रोमहर्षक कामगिरी व्दितीय क्रमांक पटकावला.

पंच म्हणून बळीराम पाटील कल्हाळे व रमेश सोनवणे यांनी काम पाहिले.स्पर्धा यशस्वी होण्यासाठी.दगडसांगवी येथीलसर्व तरुण बांधवांनी सहकार्य केले. या स्पर्धेचे आयोजन पांडुरंग पाटील फाजगे व मंगेश फाजगे व विशाल पाटील मोरतळे , राहुल फाजगे यांनी केले होते.

# ‘रूग्ण सेवा' एवढे समाधान दुसऱ्या कशातही नाही - प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे

## भाऊच्या डब्याने ओलांडला सतराशे दिवसाचा पल्ला

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



कोरोना महामारीच्या काळात रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांची अन्नासाठी ससेहोलपट होत होती. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. अशा वेळी डॉ. भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सव वाढदिवसाचे औचित्य साधून मे २०२१ पासून कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्यावतीने "भाऊचा डब्बा" हा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाला सतराशे दिवस झाले असून रूग्ण सेवे एवढे समाधान दुसरे कशातच नसल्याचे भाऊच्या डब्याचे संकलपक श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी सांगितले. शेकापचे नेते माजी खासदार व माजी आमदार डॉ. भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सवी वर्षाचे औचित्य साधून २०२१ मध्ये सुरू करण्यात आलेला "भाऊचा डब्बा" या उपक्रमाने दि. ११ बुधवारी रोजी सतराशे दिवसाचा पल्ला ओलांडला. या प्रसंगी "भाऊचा डब्बा" चे संकल्पक श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी गोरगरिबांच्या सेवेत जेवढे समाधान आहे तेवढे समाधान कशातच नसल्याचे प्रतीपदित केले. भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सव वाढदिवसाचे औचित्य साधून मे २०२१ पासून कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी श्री शिवाजी मोफत एड्युकेशन सोसायटीच्यावतीने "भाऊचा डब्बा" हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला. कोरोना संकट संपल्यानंतरही हा उपक्रम अविरतपणे सुरूच आहे. भाई आज हयात नाहीत, तरी पण कंधार व लोहा तालुक्यातील रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना भाऊच्या डब्याच्या माध्यमातून दररोज जेवणाची सोय केली जाते. या उपक्रमात जवळपास चार वर्षापासून कोणत्याच प्रकारचा खंड पडलेला नाही. प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे म्हणले : आता कोरोना हद्दपार झाला आहे. परंतू विविध आजाराने जे रुग्ण व त्यांचे नातेवाईक रुग्णालयात येतात त्यांची सेवा करण्याची संधी "भाऊचा डब्याच्या" माध्यमातून मला मिळत आहे. दिवंगत भाईंनी आपले संपूर्ण आयुष्य नाहिरेवाल्यांसाठी झिजविले. त्यांना न्याय मिळवून दिला. मन्याडखोऱ्यात शैक्षणिक दालने उघडून तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाची गंगा नेली. उपेक्षित, शोषित समाज त्यांचा केंद्रबिंदू होता. त्यांचा वसा पुढे चालविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असून रुग्ण सेवा त्याचाच एक भाग असल्याचे पुरुषोत्तम धोंडगे यांनी स्पष्ट केले.

# अध्यक्षपदी सुनील राठोड

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार येथे दरवर्षी संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केल्या जाते. सेवालाल महाराज जयंतीच्या मिरवणुकीमध्ये हजारोच्या महिला आणि बंजारा बांधवांची उपस्थिती असते. कंधार येथील इस्राम ग्रहावर बंजारा समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक आज दुपारी बारा वाजता संपन्न झाली. या बैठकीत नियोजन समितीच्या कार्यकारिणी समिति जाहीर करण्यात आली. जयंती समितीच्या अध्यक्षपदी सुनील राठोड तर स्वागतअध्यक्ष पदी सुधाकर राठोड यांची निवड करण्यात आली. झालेल्या बैठकीत खालील कार्यकारणी जाहीर करण्यात आली.अध्यक्ष सुनिल राठोड स्वागतअध्यक्ष -सुधाकर राठोड सचिव: विलास जाधव कार्याध्यक्ष: प्रविण पवार

# गांवकरी गांवकरी गांवकरी गांवकरी

**------ : (समर्थ गांवकरी)**

'रूग्ण सेवा' एवढे समाधान दुसऱ्या कशातही नाही - प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे

भाऊच्या डब्याने ओलांडला सतराशे दिवसाचा पल्ला

कंधार/प्रतिनिधी

कोरोना महामारीच्या काळात रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांची अन्नासाठी ससेहोलपट होत होती. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. अशा वेळी डॉ. भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सव वाढदिवसाचे औचित्य साधून मे २०२१ पासून कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्यावतीने "भाऊचा डब्बा" हा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाला सतराशे दिवस झाले असून रूग्ण सेवे एवढे समाधान दुसरे कशातच नसल्याचे भाऊच्या डब्याचे संकलपक श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी सांगितले.

शेकापचे नेते माजी खासदार व माजी आमदार डॉ. भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सवी वर्षाचे औचित्य साधून २०२१ मध्ये सुरू करण्यात आलेला "भाऊचा डब्बा" या उपक्रमाने दि. ११ बुधवारी रोजी सतराशे दिवसाचा पल्ला ओलांडला. या प्रसंगी "भाऊचा डब्बा" चे संकल्पक श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी गोरगरिबांच्या सेवेत जेवढे समाधान आहे तेवढे समाधान कशातच नसल्याचे प्रतीपदित केले.

भाई केशवराव धोंडगे यांच्या शतकोत्सव वाढदिवसाचे औचित्य साधून मे २०२१ पासून कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी श्री शिवाजी मोफत एड्युकेशन सोसायटीच्यावतीने "भाऊचा डब्बा" हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला. कोरोना संकट संपल्यानंतरही हा उपक्रम अविरतपणे सुरूच आहे. भाई आज हयात नाहीत, तरी पण कंधार व लोहा तालुक्यातील रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना भाऊच्या डब्याच्या माध्यमातून दररोज जेवणाची सोय केली जाते. या उपक्रमात जवळपास चार वर्षापासून कोणत्याच प्रकारचा खंड पडलेला नाही.

प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे म्हणले : आता कोरोना हद्दपार झाला आहे. परंतू विविध आजाराने जे रुग्ण व त्यांचे नातेवाईक रुग्णालयात येतात त्यांची सेवा करण्याची संधी "भाऊचा डब्याच्या" माध्यमातून मला

# ठाकरे सेनेचा मुस्लिम महापौर... काय संदेश

## डॉ. अभयकुमार दांडगे : मराठवाडा वार्तापत्र

**(समर्थ गांवकरी)**

मराठवाड्यातील परभणी महानगरपालिकेत ठाकरेंच्या शिवसेनेने मुस्लिम महापौर खुर्चीवर बसविला. सय्यद इकबाल यांची परभणीच्या महापौरपदी निवड झाली . तर काँग्रेसचे गणेश देशमुख हे उपमहापौर म्हणून निवडून आले. परभणीमधील मतदारांनी ठाकरेंच्या शिवसेनेला मतदान करताना स्वप्नातही मुस्लिम महापौरांचा विचार केला नसेल. मतदारांची ठाकरेंच्या शिवसेनेकडून चक्क फसवणूक झाल्याची भावना मराठवाड्यात निर्माण झाली आहे.

हिंदुत्वाची कास धरून स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. ठाकरेंच्या शिवसेनेचा दबदबा हा केवळ हिंदुत्ववाद या मुद्द्यामुळेच होता. एकेकाळी महाराष्ट्रात ठाकरेंचे नाव घेताच समोरच्यांचा थरकाप उडत असे. मराठवाड्यात देखील ठाकरेंच्या शिवसेनेचा एक वेगळाच वलय होता. ठाकरेंच्या शिवसेनेला मतदान करताना मतदार नेहमी स्वतःची सुरक्षा व हिंदुत्ववाद जपणारा पक्ष म्हणून ठाकरे ब्रँडकडे पाहत होते. काही दिवसांपूर्वी झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपचे मराठवाड्यात सर्वाधिक नगरसेवक निवडल्या गेले. मराठवाड्यातील परभणी महानगरपालिकेत एकूण ६५ जागांसाठी निवडणूक झाली. त्या ठिकाणी ठाकरेंच्या शिवसेनेचे बंडु जाधव हे खासदार आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली ६५ पैकी २५ नगरसेवक ठाकरेंच्या शिवसेनेचे निवडून आले. तसेच काँग्रेसचे १२ नगरसेवक निवडून आल्याने ठाकरेंची शिवसेना व काँग्रेस या दोघांकडे सत्तेची सूत्रे आली. ज्या ज्या मतदारांनी हिंदुत्वाचा पक्ष म्हणून ठाकरेंच्या शिवसेनेला मतदान केले, त्यांना वाटले असेल की मराठवाड्यात आता ठाकरेंचा महापौर हा हिंदू असेल. परंतु चक्क मतदारांच्या काळजाला लागणारी बाब महापौर निवडीवरून समोर आली. ठाकरेंच्या शिवसेनेने परभणीत महापौर पदावर बसण्याची संधी सय्यद इकबाल यांना दिली. त्यांना काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी साथ दिली. ३९ मते घेऊन मुस्लिम समुदायाचे सय्यद इकबाल हे महापौर म्हणून विराजमान झाले.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला . परंतु मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळण्यासाठी एक वर्ष वाट पहावी लागली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा स्वतंत्र झाला. मराठवाड्यावर एकेकाळी मुघलांचे राज्य होते. पूर्वी मुस्लिमांच्या तावडीत असलेला मराठवाडा आता हळूहळू पुन्हा मुस्लिम नगरसेवक ताब्यात घेत आहेत , अशी धारणा मराठवाड्यातील नागरिकांची होत आहे. तेलंगणा राज्यातील एम. आय. एम. या पक्षाने नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून मराठवाड्याच्या राजकारणात प्रवेश केला. एम. आय. एम. या पक्षाने महानगरपालिकेत मते मिळविण्यासाठी मुस्लिम बहुल भागाची निवड केली व स्वतःची ताकद दाखवून दिली. सध्या राज्यसभेचे खासदार असलेले नांदेडचे अशोक चव्हाण यांनीच एमआयएम पक्षाला नांदेड महापालिकेत आणले असे बोलले जाते. मत विभागणीसाठी खासदार अशोक चव्हाण यांनी केलेला तो प्रयत्न स्थानिक राजकारणासाठी यशस्वी ठरला असला तरी भविष्यात मराठवाड्यात हिंदू विरुद्ध मुस्लिम असेच मतदान पहावयाला मिळणार आहे. परभणी हा जिल्हा ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी ओळखला जात असला तरी त्या ठिकाणी असलेले मतदार हे कट्टर हिंदुत्ववादी आहेत. त्यांना मुस्लिम महापौर मान्य असेल असे अनेकांना वाटत नाही. परभणीतील ठाकरेंच्या शिवसेनेने निवडलेला महापौर हा भविष्यात मराठवाड्यातील राजकीय चित्र नक्कीच बदलविणारा निर्णय ठरणार आहे. ज्याप्रमाणे छत्रपती संभाजीनगरमध्ये महापालिका निवडणुकीत थेट हिंदू विरुद्ध मुस्लिम असे वातावरण निर्माण केले जाते. तीच परिस्थिती आता भविष्यात परभणी येथे दिसणार यात कोणाचेच दुमत नाही. यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत नांदेडमध्ये देखील एमआयएम पक्षाने चांगलेच यश मिळविले. नांदेड महानगरपालिकेत एमआयएम हा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. एम. आय. एम. पक्षाचे निवडून आलेले जवळपास सर्वच नगरसेवक हे पूर्वी खासदार अशोक चव्हाण यांच्या काँग्रेस पक्षाचेच नेतृत्व करत होते. परभणी महानगरपालिकेच्या महापौर निवडीवरून भविष्यात ठाकरेंच्या शिवसेनेला मराठवाड्यात थारा मिळणार नाही , हे मात्र आता उघड होत आहे. चंद्रपूरमध्ये काँग्रेसची सत्ता येईल असे वाटत असताना ऐन वेळेला त्या ठिकाणी भाजपचा महापौर खुर्चीवर बसविण्यात श्रेष्ठींना यश आले . तसाच प्रयोग परभणीत होईल की काय , अशी अपेक्षा व्यक्त केली जात असताना या ठिकाणी मात्र ठाकरेंच्या शिवसेनेला महापौरपदाची खुर्ची मिळविण्यात यश मिळाले . ठाकरे यांच्या शिवसेनेने खुर्ची मिळविली असली तरी हिंदुत्ववादी मतांचा विश्वास त्यांनी नक्कीच गमावला , असे मराठवाड्यातून बोलले जात आहे. ठाकरेंनी सय्यद इकबाल यांची महापौर पदासाठी निवड करून नेमका महाराष्ट्राला काय संदेश दिला? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

ज्या मराठीच्या मुद्द्यावरून ठाकरेंच्या शिवसेनेने मुंबईत तसेच ठाण्यात निवडणुकीचा प्रचार केला, त्याच मराठीच्या मुद्द्याला परभणीत मात्र मुस्लिम महापौर निवडीने काळीमा फासल्याची भावना परभणीकरांच्या मनात निर्माण झाली आहे. परभणीतील हिंदुत्ववादी मतांना आकर्षित करण्यासाठी भाजपला ही एक आयती संधी आलेली आहे. भविष्यात परभणीला भाजपचा गड बनविण्यासाठी त्या ठिकाणी भाजपने आपले पाय रोवणे आवश्यक आहे. राज्यात नेतृत्व करत असलेल्या मेघना बोर्डीकर यांना भाजपने बळ दिले असले तरी त्यांच्यात परभणी व परिसरातील मतदारांना भाजपकडे ओढण्याची ताकद नाही , हे देखील तेवढेच खरे आहे . त्यामुळे त्यांच्या ऐवजी इतर अन्य नेत्यांवर परभणीची जबाबदारी टाकल्यास भविष्यात भाजपला ते फायद्याचे ठरणार आहे. ठाकरेंच्या शिवसेनेवर असलेला हिंदुत्ववादी मतदारांचा विश्वास संपल्यात जमा आहे. त्यामुळे आता मराठवाड्यात उरलीसुरली ठाकरेंची शिवसेना भविष्यात दिसणार नाही ,असे बोलले जात आहे.

# एअरटेलची नवी यंत्रणा कार्यान्वित

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

स्पॅम आणि ऑनलाइन फसवणूकीच्या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी एअरटेलने आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून 'फ्रॉड अलर्ट' ही कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी अत्याधुनिक सुविधा सुरु केली आहे. 'फ्रॉड अलर्ट' ही नाविन्यपूर्ण प्रणाली ग्राहकांच्या वन-टाइम पासवर्ड संबंधित बँक फसवणूकींपासून तत्काळ प्रभावीपणे संरक्षण देते. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने संशयास्पद व्यवहार ओळखते. फसवणूकीचे व्यवहार होण्याची शक्यता असल्यास ही प्रणाली तत्काळ ग्राहकांना संबंधित व्यवहाराबद्दल सूचित करते. त्यामुळे एअरटेलचे ग्राहक ऑनलाइन फसवणूकीच्या व्यवहारातून पूर्णपणे सुरक्षित झाले आहे. घरात ऑनलाईन ऑर्डरच्या




माध्यमातून येणारे पार्सल किंवा अन्नपदार्थांचे वितरण होण्याकरिता ग्राहकांच्या मोबाईलनंबरवर येणा-या ओटीपीची मागणी केली जाते. घरपोच होणारे वितरण स्विकारताना अनेकांची लगबग सुरु असते. सायबर भामटे लोकांची होणारी धावपळ लक्षात घेत त्याचा गैरफायदा घेतात. अनेकदा वस्तू वितरण करण्याच्या बहाण्याने किंवा तातडीची सेवा देण्याच्या नावाखाली हे सायबर भामटे ग्राहकांकडून ओटीपीची मागणी करतात. कामाच्या व्यापात अडकलेल्या ग्राहकाला संबंधित ओटीपी हा बँकेऐवजी वितरणसेवेशी संबंधित असल्याचा गैरसमज होतो. प्रत्यक्षात हा ओटीपी ग्राहकांच्या बँकेतील व्यवहारांशी संबंधित गोपनीय ओटीपी असण्याची शक्यता असते. ग्राहकांकडून अनावधानाने दिलेला ओटीपी सायबर भामटे ऑनलाइन चोरीकरिता वापरुन ग्राहकांना लुबाडतात. एअरटेलची कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवी यंत्रणा अशा संभाव्य धोक्यांना वेळीच ओळखते. ग्राहकांना तातडीने सावध करते. मोबाईलवर एखाद्या संशयास्पद कॉलदरम्यान बँकेचा ओटीपी संदेश आल्यास ही यंत्रणा सतर्क होते. मोबाईलवर आलेल्या संदेशातून फसवणूक होत असल्याचे ग्राहकांच्या निदर्शनास आणून देते. फ्रॉड अलर्ट ही यंत्रणा ग्राहकांचा कॉल सुरु असला तरीही बँक व्यवहारासाठी ओटीपी स्विकारण्याचा धोका लक्षात आणून देण्यास मदत करते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी निर्णयक्षमता यांचा हा प्रभावी मेळ ग्राहकांना विचार करण्यासाठी, संबंधित फसवणूकीच्या घटनेची खातरजमा करण्यासाठी, स्वतःहूनच आपापली सुरक्षितता करण्यासाठी गरजेयुक्त वेळ उपलब्ध करुन देतो. परिणामी, ग्राहक ऑनलाइन चोरींच्या घटनांपासून सुरक्षित राहतात. एअरटेलच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नव्या प्रणालीबाबत एअरटेल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शाश्वत शर्मा यांनी आपले मत मांडले. ते म्हणाले, "एअरटेल हे सुरक्षित नेटवर्क असावे, हे आमचे ध्येय आहे. एअरटेल सुरक्षित ठेवण्याकरिता उपाययोजना शोधताना आम्हांला मोबाईलमधील वनटाइम पासवर्ड (ओटीपी)च्या माध्यमातून होणारा चोरीचा मार्ग लक्षात आला. डिजिटल व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी ओटीपी महत्त्वाची भूमिका साकारत असले तरीही चोरीसाठीही ओटीपीचा गैरवापर होतो. यावर उपाययोजना म्हणून आम्ही तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्याचे ठरवले.

# पुणेकरांना काश्मीर आयकॉनचे भावनिक आवाहन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

काश्मीर आणि महाराष्ट्र यांचे नाते केवळ पर्यटनापुरते मर्यादित नसून ते आपुलकी, विश्वास आणि परस्पर सन्मानाचे प्रतीक आहे, असे मत काश्मीर आयकॉन संघटनेने व्यक्त केले आहे. पुण्यात प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात काश्मीर आयकॉनने पुणेकरांप्रती कृतज्ञता व्यक्त करत काश्मीर पर्यटनाच्या पुनरुज्जीवनासाठी पुणेकरांनी पुढाकार घ्यावा, असे भावनिक आवाहन केले आहे. यावेळी काश्मीर आयकॉनचे व्यवस्थापकीय संचालक नासिर शाह, संचालक मीर अन्वर, अथेर यामीन, शोकत परव्तून आदी मान्यवर उपस्थित होते. काश्मीर आयकॉनच्या वतीने सांगण्यात आले की, महाराष्ट्राने नेहमीच काश्मिरी बांधवांना आपुलकीने स्वीकारले आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत हजारो काश्मिरी कारागीर व व्यापारी



महाराष्ट्रात येतात आणि येथील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग बनतात. हा केवळ व्यवसायाचा संबंध नसून परंपरा, जिव्हाळा आणि विश्वासाचे नाते असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. २२ एप्रिल रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर काश्मीरच्या पर्यटन क्षेत्राला मोठा भावनिक व आर्थिक फटका बसला आहे.

मात्र, अशा कठीण काळात महाराष्ट्राने नेहमीच काश्मीरच्या पाठीशी उभे राहत आधार दिला असल्याचे काश्मीर आयकॉनने अधोरेखित केले. या पार्श्वभूमीवर काश्मीर पुन्हा एकदा पर्यटकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज असून, या पर्यटन पुनरागमनाचे नेतृत्व पुणेकरांनी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. "इतर कोणी गेले नाही तरी पुणेकर काश्मीरला जातील," असा ठाम विश्वास व्यक्त करत "चला... चला काश्मीर!" हा भावनिक संदेश देण्यात आला.

चिनार वृक्षांची शोभा, केशराची सुवर्णशेती आणि अतिथीदेवो भवः ही काश्मीरची समृद्ध परंपरा पुणेकरांची आतुरतेने वाट पाहत असल्याचे काश्मीर आयकॉनने सांगितले.

पुणेकरांच्या एकतेच्या, माणुसकीच्या आणि संवेदनशीलतेच्या भावनेला सलाम करत काश्मीरला आपले दुसरे घर मानून पुन्हा एकदा भेट देण्याचे आवाहन काश्मीर आयकॉनच्या वतीने करण्यात आले.

# 'क्रेडाई महाराष्ट्र' तर्फे 'महाकॉन' चे अकरावे संमेलन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

'क्रेडाई महाराष्ट्र' तर्फे आयोजित 'महाकॉन' या रिअल इस्टेट क्षेत्रातील महत्त्वाच्या राज्यस्तरीय संमेलनाचे अकरावे पर्व उत्साहात पार पडले. 'बीइंग द लाइटहाऊस' (दिशादर्शक बनणे) या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात ज्ञान, नेतृत्व आणि उद्योगाच्या भविष्यातील वाटचालीवर विशेष भर देण्यात आला.

या संमेलनात देशभरातून ५००हून अधिक क्रेडाई प्रतिनिधी सहभागी झाले होते. अग्रगण्य विकसक, धोरणकर्ते, आर्थिक तज्ज्ञ आणि विचारवंत यांची उपस्थिती लाभली. क्रेडाईच्या महिला विभागातील सुमारे ३६ अधिकारी सहभागी झाल्याने सर्वसमावेशकता आणि पुढील पिढीच्या नेतृत्वाला दिलेले महत्त्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे 'क्रेडाई' चे अध्यक्ष तथा रुस्तमजी समूहाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बोमन इराणी यांचे प्रमुख भाषण. भारतीय रिअल इस्टेट बाजार झपाट्याने बदलत असल्याचे सांगताना त्यांनी गेल्या दशकात उद्योगात सुमारे १३० टक्के वाढ झाल्याचे नमूद केले. पुढील दहा वर्षांत या क्षेत्राची उलाढाल १० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचू शकते, असे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या निवास प्रकल्पांमध्ये मोठ्या संधी असून २०५० पर्यंत या क्षेत्राची बाजारपेठ ३६ अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत वाढण्याचा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

व्यावसायिक रिअल इस्टेटमध्ये मोठी क्षमता असून २०३५ पर्यंत हा बाजार १.४३ ट्रिलियन अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचू शकतो, असेही त्यांनी सांगितले. शैक्षणिक संस्था आणि रिअल इस्टेट उद्योग यांच्यात सहकार्य वाढण्याची गरज अधोरेखित करत त्यांनी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि कौशल्यविकास यांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

इराणी यांनी भविष्यात एआय आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया रिअल इस्टेट क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट केले. नियोजन, विक्री, वित्त आणि ग्राहक अनुभव या सर्व बाबींमध्ये तंत्रज्ञानामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढेल, असे त्यांनी सांगितले. 'आरई व्हिजन २०३५' या विचारमंथन सत्रात क्रेडाईचे माजी अध्यक्ष आणि मगरपट्टा टाऊनशिप डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सतीश मगर यांनी दीर्घकालीन दृष्टीकोन मांडला.



## नवीन व सुधारित ग्राहक अनुभव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मॅरिएट इंटरनॅशनल एशिया पॅसिफिक (चीन वगळता) तर्फे आपल्या गुड ट्रॅव्हल विथ मॅरिएट बोनवॉय उपक्रमांतर्गत नवीन व सुधारित ग्राहक अनुभवांचे अनावरण केले आहे.यामध्ये 12 एपीईसी बाजापेठांसह 80 हॉटेल्स व 100 अनुभवांचा समावेश असून ग्राहकांना ते भेट देत असलेल्या ठिकाणांशी व स्थानिक समुदायांशी अधिक खोलवर संबंध निर्माण करण्याची संधी मिळेल.

# सामंथा रूथ प्रभू यांची गुड गेमची जागतिक ॲम्बेसेडर म्हणून निवड

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

गुड गेम या जगातील पहिल्या अँज-लाइव्ह ग्लोबल गेमिंग रिॲलिटी शोने भारतातील पहिला ग्लोबल गेमिंग सुपरस्टार शोधण्याचा प्रवास सुरू करण्यासह भारतात आपल्या लाँचची घोषणा केली आहे. भारताचा धडाकेबाज क्रिकेट आयकॉन रिषभ पंत आणि भारतातील सर्वात प्रभावी गेमिंग क्रिएटर उज्ज्वल चौरासिया (टेक्नो गेमर्झ) यांच्यासह आघाडीची अभिनेत्री, उद्योजिका व युथ आयकॉन सामंथा रूथ प्रभू यांची जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे. गुड गेमने एक कोटी रूपयांच्या (100,000 अमेरिकन डॉलर्स) भव्य बक्षीसाची देखील घोषणा केली, जे भारतातील कोणत्याही रिॲलिटी शो विजेत्यासाठी सर्वाधिक आहे. तसेच यासोबत विजेत्याला जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी देखील मिळणार



आहे. गुड गेमची या शोमध्ये दरवर्षाला जवळपास 100 कोटी रूपयांची गुंतवणूक करण्याची योजना आहे आणि सध्या ब्रँड सहयोगी व प्रायोजकांना या अद्वितीय प्रस्तावामध्ये योगदान देण्याचे आवाहन करत आहे, जेथे 500 दशलक्ष प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असलेला हा रिॲलिटी शो भारतातील तरूणांचे लक्ष वेधून घेईल.

अद्वितीय स्पर्धात्मक रिॲलिटी स्वरूप म्हणून डिझाइन करण्यात आलेला गुड गेम देशातील स्पर्धात्मक गेमिंगसाठी नवीन अध्यायाची सुरूवात करतो, जेथे एकाच प्लेटफॉर्मवर ईस्पोर्ट्स, मुख्य मनोरंजन आणि वास्तविक विश्वातील परफॉर्मनस एकत्र येतात. उमेदवारांची त्यांच्या गेमिंग कौशल्यांसह सर्जनशीलता, ऑन-स्क्रिन उपस्थिती आणि दबावांतर्गत परफॉर्मन्स या निकषांच्या आधारे चाचणी करण्यात येईल, ज्यामधून व्यवसाय व लोकप्रिय संस्कृतीचे स्वरूप म्हणून गेमिंगचे सर्वसमावेशक पैलू दिसून येतात. हौशी व व्यावसायिक गेमर्स, कन्टेन्ट क्रिएटर्स आणि परफॉर्मर्स यांच्याकरिता ऑडिशन्ससाठी नोंदणी सध्या https://www.goodgameshow.tv/india-audition-application येथे सुरू आहे.

या लाँचबाबत मत व्यक्त करत गुड गेमचे संस्थापक राय कॉकफिल्ड म्हणाले, भारत जगातील सर्वात मोठ्या मनोरंजन व गेमिंग समुदायासाठी आश्रयस्थान आहे आणि आम्हाला भारतात पहिल्यांदाच या दोन शैलींमधील तफावत दूर करण्याचा आनंद होत आहे. गुड गेम भारतभरातील टॅलेंटना जागतिक स्तरावर त्यांची ओळख निर्माण करण्यास सक्षम करेल, तसेच जीवनातील अमूल्य संधी देईल, ज्यासह त्यांचे जीवन व करिअरला नवीन कलाटणी मिळेल. आम्हाला ब्रँड्सकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे, जे या अद्वितीय संधीसाठी सहयोग करू पाहत आहेत, ज्यामधून दीर्घकालीन कन्टेन्ट, प्रबळ समुदाय आणि उच्च क्षमतेच्या व्यवहाराचे संयोजन मिळेल.




# जुन्नर पंचलिंग झोपडपट्टी येथे आत्महत्या प्रकरणी गुन्हा दाखल

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर पोलीस स्टेशन येथे श्रीराम सोन्याबापू शिंदे पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या आदेशाने डायल ड्युटीवर कर्तव्यवहार हजर असताना ११२ नंबर वर कॉल सांगितले की, या ठिकाणी भांडण सुरू आहे . पोलीस अंमलदार विशाल चौधरी यांना घेऊन पचलिंग वस्ती या ठिकाणी गेलो असता. आकाश संजय कोळेकर वय २० वर्षे हा दारू पिऊन पंचलिंग वस्ती रस्त्यावर मोठमोठ्याने आरडाओरडा करून लोकांना मारहाण करण्याची व शिवीगाळ धमकी देत होता .लोकांवर अंगावर धावून , लहान मुले व महिला त्याला घाबरून पळून जात होते .

# लालबाबा इंजिनिअरिंगने भारत सरकारच्या स्पेशॅलिटी स्टीलसाठी पीएलआय योजनेअंतर्गत केला सामंजस्य करार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कोलकाता येथे मुख्यालय असलेल्या सीमलेस ट्यूबसच्या एकात्मिक उत्पादक लालबाबा इंजिनिअरिंग लिमिटेडने भारत सरकारच्या स्पेशॅलिटी स्टीलसाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजना १.२ अंतर्गत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या योजनेचा उद्देश देशांतर्गत स्टील उत्पादनाला बळकटी देणे हा आहे. स्टील मंत्रालयाने आयोजित केलेल्या अधिकृत स्वाक्षरी समारंभात विज्ञान भवन येथे सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली, ज्यामध्ये मेकॉन लिमिटेड या योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन संस्था म्हणून कार्यरत आहे.या मंजुरीमध्ये धोरणात्मक क्षेत्रासाठी मिश्र धातु स्टील आणि स्टेनलेस स्टीलच्या लांब उत्पादनांचा समावेश आहे. ही योजना कालमर्यादित, उत्पादनाशी




संलग्न अशी असून, आयात पर्यायांना प्रोत्साहन देणे, देशांतर्गत मूल्यवर्धन वाढवणे आणि उच्च दर्जाच्या स्टील उत्पादनांमध्ये भारताची जागतिक स्पर्धात्मकता मजबूत करणे, हा तिचा उद्देश आहे. या विकासावर भाष्य करताना, लालबाबा इंजिनिअरिंग लिमिटेडचे संचालक निकुंज धानुका म्हणाले: पीएलआय योजनेअंतर्गत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करणे हे राष्ट्रीय उत्पादन प्राधान्यांशी सुसंगत असलेल्या विशेष स्टीलवर बांधलेल्या देशांतर्गत सीमलेस ट्यूब उत्पादन क्षमतांना पुढे नेण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.तसेच, पश्चिम बंगालमधील हल्दिया येथे प्रस्तावित कोल्ड-फिनिश्ड सीमलेस ट्यूब्स विस्तार प्रकल्प देखील या योजनेअंतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र ठरणार आहे.

# अझीम प्रेमजी विद्यापीठाकडून प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अझीम प्रेमजी विद्यापीठाने त्यांच्या बंगळूरु, भोपाळ आणि रांची येथील कॅम्पसमध्ये आगामी शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया जाहीर केली आहे. या अभ्यासक्रमांसाठी इच्छुक असणाऱ्यांना २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. विद्यापीठामध्ये शिक्षणशास्त्र, विकासशास्त्र, पूर्व प्राथमिक शिक्षण (अर्ली चाइल्डहूड एज्युकेशन), अर्थशास्त्र, उपयोजित अर्थशास्त्र, सार्वजनिक आरोग्य आणि हवामान बदल व शाश्वतता या विषयांत पदव्युत्तर पदवी घेता येईल. कॅम्पसनुसार हे अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांसाठी तयार केले गेले आहेत, ज्यांना भक्कम शैक्षणिक पाया रचण्याबरोबरच समकालीन सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांचा सखोल

Azim Premji University

अभ्यास करायचा आहे. विद्यापीठाच्या बंगळूरु कॅम्पसमध्ये एम.ए. अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र (डेव्हलपमेंट) एम. ए. शिक्षणशास्त्र (एज्युकेशन), एम. ए. पूर्व प्राथमिक शिक्षणशास्त्र, एम. एस्सी. हवामान बदल व शाश्वतता; भोपाळ कॅम्पसमध्ये एम. ए. विकासशास्त्र, मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ (एमपीएच); तर रांची कॅम्पसमध्ये एम. ए. उपयोजित अर्थशास्त्र, एम. ए. विकासशास्त्र आदी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेता येणार आहे. सर्व कॅम्पसमधील हे पदव्युत्तर अभ्यासक्रम आंतरशाखीय शिक्षण, तज्ज्ञ प्राध्यापकांद्वारे अध्यापन आणि वास्तव जगातील परिस्थितींशी सतत जोडलेले राहण्यावर भर देतात.

# इंटरसिटी स्मार्टबसकडून पुणे-नागपूर मार्गावर प्युरीफाईड एअर बससेवा सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीच्या इंटरसिटी मोबिलिटी ब्रँड असलेल्या इंटरसिटी स्मार्टबसने आज पुणे-नागपूर आणि नागपूर-पुणे मार्गांवर इंटरसिटी स्मार्टबस. एक्यूआय सुरू (IntrCity SmartBus.AQI) करण्याची घोषणा केली. त्यामुळे या प्रदेशातील प्रवाशांसाठी भारतातील पहिली शुद्ध हवा देणारी बससेवा उपलब्ध झाली आहे. पुणे-नागपूर मार्गावरील स्मार्टबस.एक्यूआय सेवेला पुण्यात औपचारिकरित्या आरटीओ पुणे येथील मोटार वाहन निरीक्षक. श्रीपाद भागवत यांच्या सन्माननीय उपस्थितीत झेंडा दाखवण्यात आला. त्यावेळी इंटरसिटी स्मार्टबस चे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व मान्यवर ही यावेळी उपस्थित होते. दोन शहरांमधील बस प्रवासात आरोग्य,




सुरक्षितता आणि आरामदायी दर्जा वाढवण्याच्या कंपनीच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा हा सोहळा इंटरसिटीच्या स्वच्छ-हवेचा प्रवास उपक्रमातील मैलाचा दगड ठरला आहे. इंटरसिटी स्मार्टबसचे सह-संस्थापक आणि सीईओ मनीष राठी म्हणाले, "पुणे हे आंतरशहर प्रवासाचे एक महत्त्वाचे केंद्र असून पुणे - नागपूरसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांना येथे मोठी मागणी आहे. स्मार्टबस. एक्यूआयच्या माध्यमातून आम्ही बसमधील हवेची गुणवत्ता या प्रवासाच्या एका दुर्लक्षित पैलूवर लक्ष केंद्रित करत आहोत. प्रवाशांना श्वासावाटे स्वच्छ, सुरक्षित हवा घेत घेताना लांब अंतराचा प्रवास करता येईल याची सुनिश्चिती करणे, हे आमचे ध्येय आहे." दोन शहरांदरम्यान प्रवासाच्या मार्गांवर केबिनमधील वायू प्रदूषण जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) केलेल्या मर्यादेपेक्षा २ ते ३ पट जास्त असू शकते, असे इंटरसिटीने केलेल्या अंतर्गत पाहणीत आढळून आले आहे. यावर मार्ग काढण्यासाठी कंपनीने स्मार्टबस. एक्यूआयला सतत हवा शुद्धीकरण आणि देखरेख प्रणालींनी सुसज्ज करण्यासाठी रिस्पायरर लिव्हिंग सायन्सेस या पुरस्कारविजेत्या हवामान तंत्रज्ञान कंपनीशी भागीदारी केली आहे. या अंतर्गत पायलट प्रयोगात प्रवासाच्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त काळ पीएम २.५ ची पातळी सुमारे ४० μg/m³ वर राखण्यात आली. प्रमुख भारतीय शहरांमध्ये असलेल्या बाहेरील हवेच्या सामान्य पातळीपेक्षा ही लक्षणीयरीत्या स्वच्छ पातळी आहे.

पुणे-नागपूर कॉरिडॉरवरून प्रवास करणारे प्रवासी बुकिंगच्या वेळी इंटरसिटी ॲप किंवा वेबसाइटवरील "इंटरसिटी स्मार्टबस.एक्यूआय" टॅगद्वारे या बसेस सहजपणे ओळखू शकतील. हा टॅग प्रगत ऑनबोर्ड एअर-क्वालिटीकंट्रोल प्रणालीचा निर्देश करतो. प्रवासादरम्यान प्रवाशांना रिअल-टाइम एक्यूआय आणि पीएम २.५ पातळीसुद्धा पाहता येईल. ती ऑनबोर्ड आणि ॲपमध्ये प्रदर्शित केले जाईल, त्यामुळे संपूर्ण पारदर्शकतेची हमी मिळेल.

पुणे-नागपूर मार्गावरील ही सुरूवात आत्यंतिक प्रदूषण असलेल्या उत्तर भारतातील मार्गांवर इंटरसिटीने लागू केलेल्या स्मार्टबस.एक्यूआयच्या आधीच्या रोलआउटवर आधारित आहे. त्यानंतरच्या टप्प्यात आणखी कॉरिडॉर जोडले जाणार आहेत. इंट्रसिटीने सातत्याने ऑनबोर्ड वॉशरूम, बोर्डिंग लाउंज, डिजिटल चेक-इन आणि प्रशिक्षित बस कॅप्टन यांसारख्या श्रेणीतील प्रथमपणाचा मान असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची ओळख करून दिली आहे. स्मार्टबस. एक्यूआयच्या माध्यमातून कंपनीने या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा स्वच्छ-हवेच्या प्रवासापर्यंत विस्तार केला आहे. इंटरसिटीने एक समर्पित स्मार्टबस.एक्यूआय मायक्रोसाईटसुद्धा https://www.intrcity.com/smartbus-aqi देखील सादर केली आहे. तिथे प्रवासी या तंत्रज्ञानाचा मागोवा घेऊ शकतात, हवा शुद्धीकरण कसे कार्य करते हे समजून घेऊ शकतात आणि या स्वच्छ-हवा उपक्रमाबद्दल अधिक जाणून घेऊ शकतात.

# अनु. जाती आरक्षण उपवर्गीकरण चिंतन व नियोजन बैठक नांदेड येथे संपन्न

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

दि १२फेब्रुवारी मराठवाड्यातील निवडक बुद्धीजीवी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त अधिकारी, प्राध्यापक कर्मचारीवर्ग यांची बैठक मुक्ताई नर्सिंग कॉलेज नांदेड येथे प्रा. जी. एल. सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली व लोकस्वराज्य आंदोलनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ .रामचंद्र भरांडे,अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन साठे, आणि लालसेनेचे संस्थापक अध्यक्ष कॉ.गणपत भिसे, यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथे संपन्न झाली.या बैठकीला समाजाचे जेष्ठ नेते तथा लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे, हे काही अडचणींमुळे उपस्थित राहू शकले नाहीत.



देशात न्याय, समता, बंधुता ही मूल्यावर आधारित सर्वांना दर्जाची सामान संधी प्राप्त व्हावी यासाठी अनु. जाती व जमातीना भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाची तरतूद केली आहे. पण सर्वच जातींना त्याचा पाहिजे तेवढा लाभ अजून पर्यंत मिळाला नाही. त्यामुळे अनेक जात समुह या आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. ही सद्यस्थिती आहे. त्यामुळे बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या न्याय, समता व दर्जाची सामान संधीचे स्वप्न अधुरे राहिले आहे.

डॉ. बाबासाहेबांचा न्याय समता हाच धागा पकडून देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सहा विरुद्ध एक अशा ०७ सदस्यीय खंडपिठाने दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी आरक्षणावर निरीक्षण नोंदवतांना असे स्पष्ट केले आहे की. अनु. जातीला असलेल्या आरक्षणामध्ये उपवर्गीकर करणे गरजेचे असून ते केले पाहिजे. उपवर्गीकरण करण्याचा अधिकार त्या त्या राज्य सरकारला आहे. तो अधिकार वापरून त्यांनी आपापल्या राज्यात उपवर्गीकरण करू शकतात. असे स्पष्ट मत नोंदवले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपवर्गीकरण करण्याचा निर्णय जाहीर होताच देशातील अनेक राज्यात तात्काळ उपवर्गीकरण लागू करण्यात आले आहे. पण महाराष्ट्रात गेली पंचवीस वर्षांपासून उपवर्गीकरणाची मागणी असतांना व त्यासाठी अनेक मोर्चे,आंदोलने, अमर उपोषणे होऊन तर आता मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असून सुद्धा पुरोगामीत्वाचा टेम्भा मिरविणारे महाराष्ट्राचे राज्य सरकार वारंवार उपवर्गीकरणाचा विषय जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवत आहे. त्याबद्दल महाराष्ट्रातील काही प्रमुख संघटना प्रमुखांची चिंतन व नियोजन बैठक नांदेड येथे संपन्न झाली. या बैठकीत उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे. उपवर्गीकरण होई पर्यंत राज्यातील नोकरभर्तीला स्थगती द्यावी. अन्यथा मातंग समाज व तत्सम आरक्षण लाभ वंचित जात समुहाच्या वतीने सरकारला जाब विचारण्यासाठी येणाऱ्या अधिवेशनावर मातंग समाज व महाराष्ट्रातील सर्व सामाजिक संघटनाना सोबत घेऊन सर्वांच्या वतीने मंत्रालयावर प्रचंड महामोर्चा काढण्यात येईल असे नियोजन ठरले आहे. अनु. जातीला असलेल्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करून आरक्षणापासून लाभ वंचित असलेल्या जात समूहाला शैक्षणिक व नोकरीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सदरहू बैठकीत मातंग आणि तत्सम जातींच्या उद्धाराची आरक्षण वर्गीकरणाची चळवळ प्रामाणिकपणे, निस्वार्थपणे आणि निष्ठेने लढण्याची आवश्यकता असून त्यासाठी अशा नेतृत्वाच्या पाठीशी समाजाने उभे राहण्याचा आणि समाजातील इतर घटकांनी स्वयंसेवकांच्या भूमिकेत योगदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीत उपस्थित बुद्धीजीवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आरक्षण वर्गीकरणाची चळवळ गतिमान करून आरक्षण वर्गीकरण समाजाच्या पदरात लवकर पाडून घेण्यासाठी डॉ.रामचंद्र भरांडे, सचिन साठे, आणि कॉ. गणपत भिसे, यांनी एकत्र येऊन व्यापक लढा उभारण्याचे आवाहन केले. त्यास मा. रामचंद्र भरांडे, मा.सचिन साठे, आणि गणपत भिसे, या नेत्यांनी समाजाच्या उद्धाराच्या या विषयासाठी आम्ही बांधील असून संघटना, पक्ष किंवा विचारधारा सर्व काही बाजूला ठेवून एकजुटीने व्यापक लढा उभारण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. बैठकीच्या शेवटी पुढील लढ्याचा कृति कार्यक्रम तयार करण्यासाठी या नेत्यां समवेत लवकरच बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदरील बैठकीचे सूत्रसंचालन अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलनाचे उपाध्यक्ष परमेश्वर बंडेवार, यांनी केले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत आणि आरक्षण उपवर्गीकरणाचे अभ्यासक केशव शेकापूरकर, यांनी प्रास्ताविक केले तर आभार नांदेड नसा कामाचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब,यांनी मानले. या बैठकीस मा. डॉ. माधवराव लोकडे, मुक्ताई नरसिंग चे संस्थापक अध्यक्ष लालबाजी घाटे, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक शिवा कांबळे,यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.बैठकीस लोकस्वराज्य आंदोलन, अण्णा भाऊ साठे क्रांती सेना, लालसेना, अण्णा भाऊ साठे क्रांती आंदोलन, लसाकम व इत्तर विविध संघटना प्रमुख, जिल्हा व राज्य अध्यक्ष तथा जबाबदार व्यक्तीसह जवळपास पन्नास प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.

## राजीव गांधी महाविद्यालयाची राज्यस्तरीय स्पर्धेत चमक

### अंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत कु. गायत्री कालिदास पांचाळ यांचा प्रथम क्रमांक

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

दि. १२ फेब्रुवारी राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील विद्यार्थिनी कु. गायत्री कालिदास पांचाळ यांनी राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



अरविंद भानुशाली महाविद्यालय, किन्हवली (ता. शहापूर, जि. ठाणे) येथील ग्रंथालय विभागामार्फत भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त 'घर-घर संविधान' या उपक्रमांतर्गत 'भारतीय संविधान' या विषयावर २६ नोव्हेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रभरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. गायत्री पांचाळ यांनी आपल्या अभ्यासपूर्ण, विचारप्रवर्तक आणि प्रभावी लेखनशैलीच्या जोरावर प्रथम पारितोषिक मिळवले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, मराठी विभाग प्रमुख डॉ. माधव बसवंते, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. एच. मेहेत्रे, डॉ. व्ही. सी. ठाकूर, डॉ. राहुल धावारे,डॉ. राजू कोंडेकर, प्रा. प्रकाश कोथळे,डॉ. संदीप कोरडे डॉ. राजेश्वर कोटलवार, प्रा. सुलोचना माळवे, डॉ. ऋषिकेश मुंगल तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अश्लील कृत्ये; ११ महिलांवर कारवाई

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील माळीवाडा बसस्थानक परिसरात रस्त्याच्या कडेला उभे राहून ये-जा करणाऱ्या नागरिकांकडे अश्लील हावभाव करणे व अश्लील गाणी म्हणत सार्वजनिक वातावरण दूषित केल्याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी ११ महिलांवर गुन्हा दाखल करून कारवाई केली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (१० फेब्रुवारी) उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या सूचनेनुसार शहरात गस्त सुरू होते. दरम्यान, माळीवाडा बसस्थानक परिसरात काही महिला रस्त्याच्या कडेला उभ्या राहून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांकडे अश्लील हावभाव करत असल्याची व अश्लील गाणी म्हणत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## सुप्रसिद्ध बिलमाळ येथे महाशिवरात्री महोत्सवाची भव्य तयारी

### कीर्तन, कथा आणि महाआरतीसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**डांग : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील सुप्रसिद्ध आणि पवित्र श्रद्धास्थान असलेल्या अर्धनारेश्वर नाग ज्योतिर्लिंग मंदिर, बिलमाळ येथे देवाधिदेव महादेवांच्या पावन महाशिवरात्री पर्वानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. मंदिर ट्रस्ट आणि आयोजकांकडून उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व तयारी जोरात सुरू आहे.



महाशिवरात्री निमित्त शुक्रवारी रात्री ९ ते ११ या वेळेत पूज्य कृष्णाजी महाराज यांचे भक्तिमय कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर शनिवारी रात्री ९ ते ११ या वेळेत संजय नाना महाराज यांचे कीर्तन होणार असून भाविकांना भक्तिरसात तल्लीन होण्याची संधी मिळणार आहे.

रविवारी दुपारी १२ वाजता भव्य महाआरती व दिव्य दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

तसेच दररोज दुपारी १२ ते ३ या वेळेत प्रसिद्ध भागवताचार्या कविताबेन पगार यांच्या मधुर स्वरात शिवमहापुराण कथांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यातून भाविकांना आध्यात्मिक ज्ञानाचा लाभ मिळणार आहे. याशिवाय दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत परमपूज्य संत स्वामी अनेकरूपीजी यांचे प्रेरणादायी प्रवचन व दर्शनाचा लाभही भक्तांना मिळणार आहे.

महाशिवरात्री महोत्सवानिमित्त मंदिर ट्रस्टकडून प्रकाशयोजना, भाविकांसाठी आवश्यक सुविधा आणि शिस्तबद्ध व्यवस्थेची विशेष काळजी घेण्यात आली आहे. अर्धनारेश्वर नाग ज्योतिर्लिंग मंदिर परिवाराकडून सर्व भाविकांना महाशिवरात्रीच्या या पवित्र प्रसंगी उपस्थित राहून भगवान शिवांचे आशीर्वाद घेण्याचे हार्दिक आवाहन करण्यात आले आहे.

## ठाणे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती बैठक संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्हा नियोजन समिती (DPDC) ची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुरबाडचे आमदार किसन कथोरे, वाहतूक शाखा पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ तसेच जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व निमंत्रित सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




आमदार निरंजन डावखरे यांनी दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान वाहतूक कोंडीमुळे अडचण येऊ नये म्हणून विशेष हेल्पलाईन व ट्रॅफिक पोलिसांकडून एस्कॉर्ट सुविधा प्रभावीपणे राबवण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी ही व्यवस्था अधिक व्यापक करण्यावर भर देण्यात आला. ठाण्यातील सोसायट्यांबाहेर व सर्विस रोडवर उभ्या राहणाऱ्या कमर्शियल वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व वाहतूक समस्येकडे लक्ष वेधत, या वाहनांसाठी नगरविकास विभागाने स्वतंत्र धोरण (Policy) तयार करावे अशी मागणी आ अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी केली. यावर पालकमंत्री व उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत नगरविकास विभागामार्फत योग्य धोरण तयार करण्याची घोषणा केली.

ठाण्यातील वाढत्या भटक्या प्राण्यांच्या समस्येवर उपाय म्हणून ठाण्यात ॲनिमल ॲम्ब्युलन्स सुरू करण्याची मागणी आ अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी केली. यासाठी त्यांनी आपल्या आमदार निधीतून सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आयुक्तांना पत्र दिल्याचे सांगितले. पालकमंत्री व उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक महानगरपालिकेच्या हद्दीत ॲनिमल शेल्टर होम्स व ॲनिमल ॲम्ब्युलन्ससाठी नगरविकास खात्यातून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. बैठकीत जिल्ह्याच्या सर्वांगीण व समतोल विकासासाठी ठोस नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देत प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून विकासाला गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाची संवाद बैठक

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीने संघटनात्मक बांधणीवर भर दिला आहे. याच अनुषंगाने हदगाव पूर्व मंडळातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी आणि मार्गदर्शनासाठी उद्या शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी दगडवाडी येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत भाजपाचे मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी दिली आहे.

## कीर्ती गोल्ड कंपनीच्या खाद्यतेल भेसळ प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाची धाड

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल मधील कृष्णुर एम.आय. डी.सी. मधील नावाजलेल्या कीर्ती गोल्ड कंपनीमध्ये खाद्यतेल भेसळ प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाची अचानक धाड कीर्ती गोल्ड कंपनीचे या ठिकाणी दोन प्लाट असून या दोन्ही प्लांट मधून गेल्या दहा ते बारा वर्षांपासून भेसळ खाद्य तेलाचा पुरवठा करून जनतेच्या जीवनाशी खेळ खेळला जात असल्याची चाहूल अन्न व प्रशासन विभागाला उशिरा लागली असल्यामुळे जनतेमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे या कंपनी बद्दल बऱ्याच वर्तमानपत्रांनी व समाजसेवकांनी भेसळ केल्याबद्दल अन्न व औषध प्रशासन विभाग, व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे नेहमी पाठपुरावा केला आहे पण आन्न व औषध प्रशासन व प्रदूषण



नियंत्र मंडळ हे दोन्हीही विभाग कीर्ती गोल्ड कंपनीच्या हातचे बाहुले बनल्यामुळे ही कंपनी नायगाव मतदारसंघा सह नांदेड जिल्ह्यातील जनतेला विषारी खाद्यतेल खाऊ घालून जनतेच्या जीवनाशी खेळ खेळत असल्याची चर्चा रंगली होती ही चर्चा अन्न व प्रशासन विभागापर्यंत उशिरा का होईना पोहोचली व अन्न व औषध प्रशासन विभाग आता धाड टाकून या दोन्ही कंपनीला शील ठोकून या कंपन्या बंद करते की काय ? की परत ये रे माझ्या मागच्या याच म्हणीप्रमाणे त्या कंपनीच्या मालकाला व त्या कंपनीला क्लीन चीट देते की काय अशी भावना जनतेतून उमटत आहे कीर्ती गोल्ड कंपनीचा मालक हा लातूरचा असून तो सोयाबीन पासून तेल तयार करतो मात्र त्या तेलामध्ये अनेक विषारी घटक पाम तेल टाकून ते तेल नागरिकांना जनतेला खायला विकतो यामुळे बऱ्याच आजारांना जनतेला सामना करावा लागत आहे पण हा विषारी तेलाचा धंदा बिनडोकपणे चालत असल्यामुळे जनतेलाही त्या तेलाची सवय लागली आहे आता मात्र अन्न व औषध प्रशासन या कंपनीवर काय कारवाई करेल याकडे नायगाव तालुक्यासह नांदेड जिल्ह्याचे लक्ष लागले.

## पत्रकाराला बातमी लावल्याच्या रागातून जीवे मारण्याची धमकी

- निवृत्त पोलीस निरीक्षकासह ८ जणांवर गुन्हा दाखल

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

मुंब्रा पोलीस ठाण्यात बुधवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी नोंद झालेल्या गंभीर गुन्ह्यामुळे पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर तसेच कायद्या व सुव्यवस्थेवर थेट आव्हान उभे राहिल्याने तीव्र प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे. फिर्यादी पत्रकार विकास रामचंद्र जगताप यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता (BNS) 2023 अंतर्गत कलम 351(2), कलम 352, कलम 3(5) तसेच महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार (प्रतिबंध, प्रतिषेध व निवारण) अधिनियम 2016 मधील कलम 7 अन्वये एकूण आठ जणांविरुद्ध गुन्हा क्र 166/2026 नुसार दाखल करण्यात आला आहे. आरोपींची नावे शिवनाथ गंगाराम शिंदे (सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक), सुदाम गंगाराम शिंदे, भूषण सुदाम शिंदे, धीरज भरत शिंदे, अभिषेक भगवान शिंदे, चेतन सुदाम शिंदे, शुभम अगिनाथ शिंदे आणि पंकज भरत शिंदे हे नमूद करण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, दिवा शहरात राहणारे पत्रकार विकास जगताप यांनी दौंड पोलीस ठाण्यात यापूर्वी दाखल झालेल्या सामाजिक बहिष्कार प्रकरणाची वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध केली होती आणि त्या वृत्तांकनाचा राग मनात धरून वरील नमूद आरोपींनी संगनमताने पत्रकाराला लक्ष्य केले. विविध व्हॉट्सॲप ग्रुपवर अश्लील, अवमानकारक आणि धमकीवजा संदेश प्रसारित करण्यात आले.

## वृक्षतोड प्रकरणी अधिकाऱ्यांसह ठेकेदारांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन - मनोज प्रधान

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगर पालिका हद्दीत 8.24 किलोमीटर अंतरावरील झाडे कापण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. मात्र, ही तोडलेली झाडे कोलशेत येथे लावण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, हे आदेश धाब्यावर बसवून जिओ टॅगिंगशिवाय सुमारे 300 झाडांची कत्तल करण्यात आल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या नेतृत्वाखाली वृक्षारोपण आंदोलन करण्यात आले. आनंद नगर ते साकेत उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या बांधकामासाठी सुमारे 1847 झाडांची कत्तल



करण्यात येणार आहे. त्यापैकी जिओ टॅगिंगशिवाय 300 झाडे कापून त्यांची पुनःर्लागवड करण्यात आलेली नाही. त्यानिषेधार्थ ज्या ठिकाणी झाडे कापण्यात आली आहेत त्या सर्व्हीस रोड परिसरातच वृक्षारोपण करून राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी झाडे वाचविण्यासंदर्भात फलक हातात घेतले होते. या प्रसंगी माध्यमांशी बोलताना मनोज प्रधान म्हणाले, आनंद नगर ते साकेत दरम्यान उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. 8.24 किलोमीटरच्या या पुलाचे बांधकाम 48 महिन्यात पूर्ण करायचे असून त्यासाठी 1847.72 कोटी रूपयांचे कंत्राट देण्यात आले आहे. या मार्गात 1 हजार 788 बाधीत होत आहेत. ही झाडे कापून त्याचे क्रमांक जिओ टॅगिंग करून कोलशेत येथे पुनःर्लागवड करण्याचे आदेश देण्यात आले असून हे काम स्वामी समर्थ इंटरप्रायझेस या कंत्राटदाराला देण्यात आलेले आहे. या कंत्राटदाराने 171 झाडे मुळापासून काढून ती कोलशेत येथे लावणे गरजेचे असताना त्याने सुमारे 300 झाडे रात्रीच्या अंधारात कापून नष्ट केली आहेत. या कामात त्याला पालिकेच्या अधिकाऱ्यांनीही साह्य केले आहे. दरम्यान सुमारे 30 वर्षापूर्वी ही झाडे आपणच लावली होती. टी चंद्रशेखर हे आयुक्त असताना ही प्रक्रिया राबविण्यात आली होती. आता या झाडांची अमर्याद कत्तल होत असताना पालिका मूग गिळून गप्प आहे. आज ठाण्याचे प्रदूषण मानांकन 300 च्या घरात पोहचत आहे. त्याचे ठामपा अधिकाऱ्यांना सोयर सुतक नाही. मात्र, आपण निसर्गाचा समतोल बिघडविणार्या यंत्रणेविरोधात रणशिंग फुंकणार आहोत. ठामपाच्या सर्वसाधारण सभेत याविरोधात आमचे नगरसेवक आवाज उठवतील, असा इशाराही याप्रसंगी मनोज प्रधान यांनी दिला.

या आंदोलनात नगरसेविका मनिषा भगत , नगरसेवक सुधिर भगत, नगरसेविका दिपाली भगत, युवक कार्याध्यक्ष राजेश कदम ,महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मकसूद खान , जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम , मेहरबानो पटेल , राजु चापले, शशिकला पुजारी, मल्लिका पिल्ले , विष्णू माने , जगत सिंग, सुनील तिवारी , साहिल उदुगडे , श्रीकांत बर्वे, सौरभ वर्तक, कृणाल पाटील, वनिता भोर, दिलीप नाईक, बबन सांगळे आदी सहभागी झाले होते.

# नागवडे कारखान्याच्या गळीत हंगामाची सांगता

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने विविध आव्हानांवर मात करत सन २०२५-२६ या गळीत हंगामात तब्बल ५ लाख ८० हजार मे.टन ऊसाचे गाळप पूर्ण केले आहे. या यशस्वी हंगामासाठी सभासद व उत्पादक शेतकरी, ऊसतोड मुकादम, मजूर, वाहतूकदार, ठेकेदार आणि कामगार यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे प्रतिपादन चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले. मंगळवार, दि. १० रोजी दुपारी ४.३० वाजता गळीत हंगामाचा समारोप करण्यात आला. यावेळी बोलताना नागवडे म्हणाले की, श्रीगोंदा तालुक्यात उसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत आहे. सभासद शेतकऱ्यांनी गाळपासाठी थोडी प्रतीक्षा करून सहकार्य केल्यास भविष्यात उच्चांकी गाळप साध्य होऊ शकते व त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळेल. कारखाना किमान फेब्रुवारी अखेरपर्यंत सुरू राहिला असता, तर उद्दिष्ट गाठणे शक्य झाले असते, असेही त्यांनी नमूद केले. या हंगामात कारखान्याने ६ लाख ६ हजार क्विंटल साखर उत्पादन केले असून सरासरी साखर उतारा १०.५० टक्के मिळाला आहे. संचालक मंडळाने घेतलेल्या धाडसी निर्णयांमुळे मशिनरीमध्ये करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बदलांमुळे दैनंदिन गाळप क्षमता ६५०० ते ७००० मे.टनांपर्यंत वाढली आहे. त्यामुळे आगामी काळात कमी दिवसांत अधिक गाळप करणे शक्य होणार असून यासाठी सभासद व ऊस उत्पादकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरणार असल्याचे नागवडे यांनी स्पष्ट केले. कारखान्याचे संस्थापक स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी सभासद शेतकऱ्यांना न्याय देण्याची भूमिका सातत्याने जपली. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत सभासदांना अधिकाधिक ऊस दर देण्याचा प्रयत्न कारखान्याकडून करण्यात आला आहे. ऊस भावाच्या बाबतीत नागवडे कारखाना नेहमीच अग्रेसर राहिल्याचे त्यांनी सांगितले.




यावेळी संचालक लक्ष्मण रायकर, मारुती पाचपुते व ज्ञानदेव खरात यांच्या हस्ते गव्हाणीची विधिवत पूजा करून श्रीफळ व अखेरची मोळी गव्हाणीत टाकण्यात आली.

कार्यक्रमास व्हा. चेअरमन सौ. मेघा औटी यांचे पती संदीपराव औटी, संचालक भाऊसाहेब नेटके, शरदराव जगताप, विश्वनाथ गिरमकर, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, बंडू जगताप, प्रा. सुरेश रसाळ, प्रवीण लबडे, दत्तात्रय कातोरे, कामगार युनियनचे अध्यक्ष रामभाऊ लबडे, मधुकर हिरवे, दीपक तारकुंडे, मुकादम धुलचंद राठोड, नामदेव राठोड, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, सर्व खातेप्रमुख, कामगार, ऊस उत्पादक शेतकरी व सभासद उपस्थित होते. संचालक सुभाष शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले, तर श्रीनिवास घाडगे यांनी आभार प्रदर्शन केले.

# “कुणाल तसा नाही जसा तो दिसतो : ‘लक्ष्मी निवास’ मालिकेत प्रवेश करणारा किंशुक वैद्य!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील ‘लक्ष्मी निवास’ ही कौटुंबिक मालिका मध्यमवर्गीय स्वप्ने, नाती आणि संयुक्त कुटुंबातील दैनंदिन वास्तविकता यांचे हृदयस्पर्शी चित्रण करून प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करत आहे. लक्ष्मी आणि श्रीनिवास यांच्या प्रवासाला केंद्रस्थानी ठेवत, ही मालिका सातत्याने प्रेम, त्याग आणि एकत्र आयुष्य घडवताना घ्यावे लागणारे कठीण निर्णय यांचे नवीन स्तर उलगडत आहे. कथेला एक नवीन आणि रोचक वळण देत लोकप्रिय अभिनेता किंशुक वैद्य ‘लक्ष्मी निवास’ मध्ये कुणालच्या महत्त्वपूर्ण भूमिकेत सहभागी होत आहे. कुणाल हा एक असा माणूस आहे की जो दिसायला जणू खूपच परिपूर्ण वाटतो: देखणा, यशस्वी, सुसंस्कृत आणि दुसऱ्यांचा आदर करणारा. त्याच्या शांत आणि



सुसंस्कारी वर्तनामुळे तो लगेचच सर्वांची मने जिंकतो. कोणत्याही कुटुंबाला आपल्या मुलीसाठी योग्य वाटेल असा तो मुलगा वाटतो. वैयक्तिक आयुष्यात रोमँटिक आणि व्यावसायिक जीवनात अत्यंत एकाग्र असलेला कुणाल भावना आणि अपेक्षा यांचे सहज संतुलन राखू शकतो. मात्र त्याच्या या परिपूर्ण दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाच्या आड एक अत्यंत गुंतागुंतीचा स्वभाव लपलेला आहे. कथानक पुढे सरकत असताना प्रेक्षकांना कळत जाते की कुणालच्या वागण्यात काही विलक्षण वैशिष्ट्ये आहेत आणि त्याच्या भावनांचे स्तरही खूप खोल आहेत. त्यामुळेच तो ‘लक्ष्मी निवास’ मध्ये आतापर्यंत प्रवेश केलेल्या सर्वांत रोचक पात्रांपैकी एक ठरतो. आपल्या प्रवेशाबद्दल बोलताना किंशुक वैद्य म्हणाला, “कुणाल हे पात्र वरवर खूप सुसंगत आणि आकर्षक वाटते, कोणाशी काय बोलावे, कसे वागावे आणि लोकांच्या आयुष्यात आपली जागा कशी निर्माण करावी हे त्याला उत्तम ठाऊक आहे. पण अभिनेता म्हणून मला सगळ्यात जास्त उत्सुकता याची आहे की त्याच्या बाह्य व्यक्तिमत्त्वाखाली खूप काही दडले आहे. ही व्यक्तिरेखा अनेक स्तर असलेली, अनपेक्षित आणि भावनांनी भरलेली अशी आहे, ज्याचा अंदाज तुम्हांला सहज येणार नाही. त्याच्या विविध छटा शोधताना मला खूप आनंद होत आहे कारण तुम्हांला त्याच्याबद्दल ज्या क्षणी वाटतं की आता तो समजला, तेव्हाच तो काहीतरी नवीन दाखवतो.

# लिंपणगावच्या सिद्धेश्वर महाराजांचा महाशिवरात्री निमित्त यात्रा उत्सव

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या लिंपणगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांचा महाशिवरात्री निमित्त यात्रा उत्सव रविवार, १५ फेब्रुवारीपासून प्रारंभ होत आहे. यापूर्वी पंचक्रोशीतील लिंगाळेश्वर महाराजांचा यात्रा उत्सव उत्साहात पार पडला. लिंपणगावच्या यात्रेनिमित्त यात्रा कमिटीच्या वतीने तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेच्या पहिल्या दिवशी महाशिवरात्री असल्याने पहाटे पंचक्रोशीतील भाविक कुटुंबांसह श्री सिद्धेश्वर महाराजांना महाभिषेक घालतात. त्यानंतर रविवारी (१५ फेब्रुवारी) सायंकाळी ९ ते रात्री ११.३० या वेळेत ज्येष्ठ कीर्तनकार हरिभाऊ महाराज दिघे (दिघोळ) यांचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. सोमवारी (१६ फेब्रुवारी) सकाळपासून पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून वाजत-गाजत शेरणी वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. त्याच दिवशी रात्री ८ ते ११ या वेळेत श्री सिद्धेश्वर महाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणुकीदरम्यान शोभेच्या दारूकामाची आकर्षक आतषबाजी होणार असून, रात्री ११ वाजता गावच्या वतीने महाभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर मंगला बनसोडे व नितीन कुमार बनसोडे यांच्या बहुरंगी लोकनाट्याचा कार्यक्रम सादर होईल. मंगळवारी (१७ फेब्रुवारी) मंगला व नितीन कुमार बनसोडे यांचा हजर्याचा लोकनाट्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच दुपारी साडेतीन ते सहा या वेळेत मल्लांसाठी जंगी आखाड्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्वर महाराज हे नवसाला पावणारे देवस्थान मानले जात असल्याने महाशिवरात्रीच्या दिवशी दूरवरून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. दैवतावरील अपार श्रद्धेमुळे तालुक्यात या यात्रेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सध्या ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकांकडे असला तरी अनेक वर्षांपासून तरुण कार्यकर्ते एकत्र येऊन यात्रा उत्सवाचे आयोजन करीत आहेत. यावर्षीही यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# सीईओ आनंद भंडारी यांच्याकडून कोळगाव ग्रामपंचायत विकासकामांची पाहणी

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कोळगावला भेट

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कोळगाव ग्रामपंचायतीस भेट देत विविध विकासकामांची पाहणी केली.

यावेळी कोळाई देवी मंदिर परिसरात ३० गुंठे क्षेत्रावर करण्यात आलेल्या ४ हजार वृक्षांच्या घनवन लागवडीसह इतर वृक्षलागवड उपक्रमाची त्यांनी पाहणी केली. तसेच सैनिक सांस्कृतिक ‘वीर भवन’ व सैनिक कार्यालयालाही भेट दिली.

ग्रामपंचायतीने उत्पन्न वाढीसाठी राबविलेल्या उपक्रमांचीही त्यांनी माहिती घेतली. यात ॲम्बुलन्स सेवा, वैकुंठ दशक्रिया विधी सेवा, मैला उपसा



गाडी आदी उपक्रमांचा समावेश आहे. कोळगाव येथे उभारण्यात आलेले ग्रामीण रुग्णालय, बांधकामाधीन ग्रामपंचायत सचिवालय, दशक्रिया विधी परिसर तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचीही त्यांनी बारकाईने पाहणी केली.

‘आपले सरकार सेवा’ अंतर्गत ५९२ सेवा उपलब्ध करून देणे, ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार पेटीची व्यवस्था, ‘ग्रामसंवाद’ व ‘मेरी पंचायत पंचायत निर्णय’ ॲप डाउनलोड करण्याबाबत जनजागृती, आयुष्मान भारत कार्ड वितरण, लोकसहभागातून ग्रामविकास, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, वनराई बंधारे, जलतारा प्रकल्प व रेनवॉटर हार्वेस्टिंग, सोलर प्रकल्प, १२ हजार मियावाकी वृक्षलागवडीची तयारी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, ग्रामपंचायत कार्यालय परिसराचे सुशोभीकरण, ओपन जिमची उभारणी, प्रत्येक बुधवारी श्रमदान, सेवानिवृत्त माजी सैनिकांचा सत्कार आदी विविध उपक्रमांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

ना-नफा, ना-तोटा तत्त्वावर ग्रामस्थांना उपलब्ध करून दिलेले मंगल कार्यालय, दशक्रिया विधी स्थळी सोलर सुविधा तसेच गरम व थंड पाण्याची व्यवस्था यांचीही पाहणी करण्यात आली. मैला गाळ व्यवस्थापनासाठी सक्शन मशिन खरेदी करणारी कोळगाव ही तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत असल्याची नोंद यावेळी घेण्यात आली.

या प्रसंगी गटविकास अधिकारी राणीताई फराटे, सहाय्यक गटविकास अधिकारी, विविध विभागांचे विस्तार अधिकारी यादव, बनकर, कक्ष अधिकारी थोरात, कोळगाव ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच पुरुषोत्तम लगड, उपसरपंच विलास शितोळे, ग्रामपंचायत सदस्य चिमणराव बाराहाते, निखिल लगड, नंदू लगड, महेंद्र रणसिंग, जयराज लगड, निलेश काळे, प्रतीक लगड, तंटामुक्ती समिती अध्यक्ष दत्तात्रय लगड, ग्रामविकास अधिकारी शरद कवडे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

सीईओ आनंद भंडारी यांनी कोळगावमधील विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच ग्रामस्थांनी घरपट्टी, पाणीपट्टी व इतर कर वेळेत भरून ग्रामपंचायतीला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे कर आकारणीचा प्रश्न मार्गी लागेल व कोळगाव ग्रामपंचायत स्पर्धेत निश्चितपणे पुढे येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# डॉ खेंडके यांच्या अविरत आरोग्य सेवेची ४० वर्षे पूर्ण

- राही हॉस्पिटलचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहरातील आरोग्यसेवेत मोलाची भर घालणाऱ्या राही हॉस्पिटलच्या स्थापनेला ४० वर्षे पूर्ण झाली असून हा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक २६ जानेवारी १९८६ रोजी डॉ. पोपटराव खेंडके व डॉ. अशोकराव खेंडके यांनी श्रीगोंद्यात *“राही हॉस्पिटल”*ची स्थापना केली. हॉस्पिटलचे उद्घाटन प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संगमनेरकर व सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. लक्ष्मण देशपांडे (वऱ्हाड निघाले लंडनला) यांच्या हस्ते झाले होते.

डॉ. पोपटराव खेंडके हे तत्कालीन सरकारी रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असताना, डॉ. अशोकराव खेंडके यांच्यासोबत राही हॉस्पिटलच्या



माध्यमातून श्रीगोंद्यात प्रथमच सुसज्ज व मोठ्या रुग्णालयाची सुविधा उपलब्ध करून दिली. दौंड, अहमदनगर व पुणे येथील विविध तज्ज्ञ डॉक्टरांना बोलावून रुग्णांना बालरोग, शस्त्रक्रिया, प्रसूतीसह सर्व प्रकारचे उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. या दीर्घ कालावधीत असंख्य रुग्णांचे प्राण वाचविण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. तसेच, उपचारासाठी बाहेर जाण्याची गरज न पडता श्रीगोंद्यातच उपचार घेण्याची सवय नागरिकांमध्ये रुजवली.

रुग्णसेवेसोबतच सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.


राही हॉस्पिटलच्या वतीने अनेक मोफत आरोग्य शिबिरे, नेत्ररोग तपासणी शिबिरे व रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली. तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त व नगर जिल्ह्याचे भूषण मा. पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन श्रीगोंद्यातील डॉक्टरांना उपलब्ध करून देण्यात आले.

यासोबतच प्रा. लक्ष्मण देशपांडे, श्रेया बुगडे (चला हवा येऊ द्या) तसेच मा. बाबासाहेब सौदागर यांसारख्या नामवंत कलाकारांना श्रीगोंद्यात आमंत्रित करून शहराच्या सांस्कृतिक जीवनात मोलाची भर घालण्यात आली. डॉ. खेंडके यांचे कनिष्ठ बंधू डॉ. बाळासाहेब खेंडके हे उत्कृष्ट कलाकार असून त्यांच्या कलागुणांना नेहमीच प्रोत्साहन देण्यात आले.

सन १९८८ मध्ये तालुक्यातील सर्व डॉक्टरांना एकत्र घेऊन श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनची स्थापना करण्यात आली. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून डॉ. पोपटराव खेंडके यांनी उल्लेखनीय कार्य केले असून आजही ते संघटना व सहकारी डॉक्टरांना मार्गदर्शन करीत आहेत. तसेच १९९२ मध्ये स्थापन झालेल्या शारदा शैक्षणिक संस्थाचे सचिव म्हणून डॉ. अशोकराव खेंडके यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानही महत्त्वपूर्ण ठरले आहे.

# देवच्या भावनिक दृष्ट्या नाजूक क्षण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



झी टीव्ही आपल्या दमदार नायकांमधून ‘मर्द को दर्द नहीं होता’ या रूढीवादी संकल्पनेला छेद देत आहे कारण हे नायक आपली संवेदनशील बाजू दाखवायला घाबरत नाहीयेत. समाजात अशी ठाम गैरसमजूत आहे की “खरा पुरुष” म्हणजे कधीही न डगमगणारा, कायम संयमी आणि कधीही आपला कमीपणा न दाखवणारा असतो. पण जेव्हा गोष्ट कुटुंबाबद्दल असते तेव्हा अनेक पुरुष एक वेगळेच सत्य दाखवतात, जिथे ताकद आणि संवेदनशीलता या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकतात. झी टीव्हीच्या ‘वसुधा’ मालिकेत देवची भूमिका साकारणारा अभिनेता अभिषेक शर्माने प्रेक्षकांच्या मनाची तार छेडली आहे.

# “डॉक्टर” समाजातील एक जबाबदार घटक

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

- मा. किरण शिंदे (पो. नि. श्रीगोंदा)
- संविधान वाचनाने न्यायवैद्यकीय कार्यशाळेचे उद्घाटन

श्रीगोंदा शहर मेडिकल असोसिएशन आणि एपेक्स कन्सल्टन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित न्यायवैद्यकीय कार्यशाळेचे उद्घाटन संविधान वाचनाने करण्यात आले. या कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. किरण शिंदे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पो.नि. शिंदे यांनी डॉक्टर हे समाजातील अत्यंत जबाबदार घटक असल्याचे सांगितले. वैद्यकीय क्षेत्रातील कामकाज करताना डॉक्टरांना अनेक न्यायप्रविष्ट प्रकरणांना सामोरे जावे लागते. त्यामुळे वैद्यकीय ज्ञानासोबतच कायद्याचेही प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बाल लैंगिक अत्याचार (पॉक्सो), महिला अत्याचार तसेच इतर गुन्ह्यांमध्ये डॉक्टरांवर विशेष कायदेशीर जबाबदाऱ्या येतात. या जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने पार पाडल्या गेल्या नाहीत, तर पीडितेला न्याय मिळण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी पॉक्सो कायद्याबाबत सविस्तर माहिती देत संबंधित प्रक्रियेचे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. मझहर सय्यद यांच्या संविधान वाचनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संतोष काकडे होते. डॉ. अनुप बगाडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विकास सोमवंशी व डॉ. अरुण ढवळे यांनी प्रस्तावना मांडली, तर डॉ. सुभाष देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमात डॉ. अशोक खेंडके यांचा ४० वर्षांच्या दीर्घ आरोग्यसेवेबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच मा. सुनीता अनिल घोडके व डॉ. प्रियांका सुशील शिंदे यांचा नूतन नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल गौरव करण्यात आला.

यावेळी डॉ. राजेंद्र पाचपुते, डॉ. अरुण रोडे, डॉ. जयेश कदम, डॉ. हंबीर म्हस्के, डॉ. सागर ताकपेर, डॉ. आनंद काकडे, डॉ. मच्छिंद्र जांभळे, डॉ. सचिन जाधव, डॉ. गोविंद भोईटे, डॉ. प्रवीण सोमवंशी, डॉ. अनिल कोकाटे, डॉ. साहेबराव खेतमाळीस, डॉ. भालचंद्र गुणवरे, डॉ. राज सय्यद, डॉ. इम्रान जमादार, डॉ. सागर ठवाळ, डॉ. देवीदास थोरात, डॉ. दिगंबर हिरवे, डॉ. पल्लवी कन्हेरकर, डॉ. सचिन नवले, डॉ. अविनाश वाळके, डॉ. शिंदे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# नाशिक विभागीय अध्यक्षपदी संदीप आल्हाट यांची निवड

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पदविकाधर पशुवैद्यक संघटनेच्या नाशिक विभागीय अध्यक्षपदी श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रिक येथील संदीप भाऊसाहेब आल्हाट यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह नाशिक विभागातील पदविकाधर पशुवैद्यक कर्मचारीवर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आल्हाट हे सध्या पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती श्रीगोंदा येथे पशुधन पर्यवेक्षक या पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी पारगाव सुद्रिक ग्रामपंचायतीत लिपिक म्हणून कार्यरत असताना त्यांनी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीवर काम केले आहे. त्यामुळे संघटनात्मक कामकाजाचा




त्यांना चांगला अनुभव आहे. सामाजिक व संघटनात्मक चळवळींमध्ये सक्रिय सहभाग, तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्वांवर विश्वास ठेवून काम करण्याची त्यांची कार्यपद्धती असल्याने पशुवैद्यक कर्मचाऱ्यांमध्ये त्यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे. आल्हाट यांच्या निवडीबद्दल अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध स्तरांतून तसेच पशुवैद्यक क्षेत्रातील सहकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# अस्वच्छतेच्या विळख्यात पडघ्यातील सार्वजनिक विहीर

## ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नामशेष होण्याचा धोका : तक्रार करूनही कारवाई नाही; कचरा व बांधकाम साहित्यामुळे पाणी दूषित

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघा येथील नागरिकांची तहान भागवणारी आणखी एक ऐतिहासिक सार्वजनिक विहीर सध्या अस्वच्छता आणि अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली असून नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. मुख्य रस्त्याच्या कडेला, डॉ. भांगरे यांच्या घरासमोर असलेली ही दगडी बांधकामातील जुनी विहीर आज अक्षरशः अडगळीत पडली आहे. परिसरात वाढलेल्या अस्वच्छतेमुळे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विहीर हा पाण्याचा नैसर्गिक स्त्रोत असून भूजल पातळी टिकवून ठेवण्यात तिची



महत्त्वाची भूमिका असते. अशा या जलसंपत्तीचे जतन आणि संवर्धन करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी असताना प्रत्यक्षात मात्र तिच्याकडे पूर्णपणे कानाडोळा केला जात असल्याचे दिसून येते. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते शरद साने यांनी महिन्याभरापूर्वी विहीर स्वच्छता आणि संरक्षणाबाबत पडघा ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार अर्ज दिला होता. मात्र त्या अर्जाकडे ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने विहिरीची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. सध्या विहिरीच्या सभोवती बांधकाम व्यावसायिकांनी खडी, दगड, विटा, माती तसेच इतर बांधकाम साहित्याचा साठा करून ठेवला आहे. त्यामुळे परिसर अस्वच्छ झाला असून विहिरीच्या रचनेलाही धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, परिसरातील काही नागरिक तसेच रविवारी भरल्या जाणाऱ्या आठवडा बाजारातील काही दुकानदारांकडून विहिरीत कचरा, प्लॅस्टिक पिशव्या आणि इतर घाण टाकली जात असल्याने पाणी दूषित झाले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात दगडी बांधकामातून उभारलेली ही विहीर भरपूर झऱ्यांनी युक्त असून एकेकाळी पडघेकरांसह आठवडा बाजारात येणाऱ्या नागरिकांची तहान भागवत होती. पाणीटंचाईच्या काळात ही विहीर मोठा आधार ठरू शकते, अशी स्थानिकांची भावना आहे. मात्र वाढते नागरीकरण, अतिक्रमण आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे तिचे ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व धोक्यात आले आहे. यापूर्वीही ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे ‘सतीची विहीर’ बुजविण्यात भू-माफियांना यश आल्याची आठवण नागरिक करून देत आहेत. आता ही दुसरी विहीरही त्याच मार्गावर जाऊ नये, अशी मागणी होत आहे. विहिरीतील साचलेली घाण तातडीने काढून परिसराची स्वच्छता केल्यास आठवडा बाजारातील व्यापारी व नागरिकांसाठी ती पुन्हा उपयोगी ठरू शकते. मात्र सध्या कचऱ्याचे साम्राज्य आणि अतिक्रमणामुळे विहिरीचे सौंदर्य पूर्णपणे नेस्तनाबूत झाले आहे. पडघा ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देऊन विहिरीचे संवर्धन, स्वच्छता आणि अतिक्रमण हटविण्याची कारवाई करावी, अन्यथा पडघ्यातील ही ऐतिहासिक जलसंपदा कायमची नामशेष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.